महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २८३ वे दिनांक : ०९/१०/२०२६ वार : शुक्रवार

## अंबरनाथमध्ये १९.९९ कोटींचा 'उमेद मॉल'; बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ

**ठाणे :** महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना कायमस्वरूपी आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अंबरनाथ येथे 'उमेद मॉल' अर्थात जिल्हा विक्री केंद्र उभारण्याच्या कामाला महाराष्ट्र शासनाने १९ कोटी ९९ लाख ६० हजार रुपयांची प्रशासकीय मान्यता दिली आहे. ग्रामविकास विभागाने ७ ऑक्टोबर २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारला जाणार आहे. महिला बचत गटांच्या उत्पादनांना केवळ विविध प्रदर्शनांमध्ये किंवा हंगामी बाजारपेठेत विक्रीची संधी न मिळता, वर्षभर उपलब्ध असलेली कायमस्वरूपी बाजारपेठ निर्माण करणे, हा 'उमेद मॉल' योजनेचा प्रमुख उद्देश आहे. अंबरनाथ येथील 'उमेद मॉल'च्या बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पाची एकूण अंदाजपत्रकीय किंमत १९ कोटी ९९ लाख ५९ हजार ९०३ रुपये ९३ पैसे इतकी आहे. या प्रकल्पासाठी प्रस्तावित बांधकाम क्षेत्र ५,१७५.४२ चौरस मीटर आहे. जिल्ह्यातील महिला स्वयं-सहाय्यता समूहांना त्यांच्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी आधुनिक आणि सुविधायुक्त केंद्र उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या मॉलची उभारणी केली जाणार आहे. प्रकल्पामध्ये मुख्य इमारतीसोबतच पावसाच्या पाण्याचे संधारण, सौरऊर्जा व्यवस्था, दिव्यांगांसाठी रॅम्प, फर्निचर, पाणीपुरवठा आणि स्वच्छतागृहांची सुविधा, विद्युतीकरण, HVAC प्रणाली तसेच अग्निशमन यंत्रणा आदी आवश्यक सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. मुंबईतील महालक्ष्मी सरस कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटांच्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला होता. त्यावेळी महिला बचत गटांना कायमस्वरूपी विक्रीची जागा उपलब्ध करून देण्याचा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिला होता. अंबरनाथ येथील 'उमेद मॉल'ला मिळालेली प्रशासकीय मान्यता ही त्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी मेहनतीने तयार केलेल्या वस्तूंना अनेकदा स्थानिक पातळीवरच मर्यादित बाजारपेठ मिळते. प्रदर्शन, मेळावे किंवा विशेष उपक्रमांच्या माध्यमातून काही काळ विक्रीची संधी मिळत असली, तरी वर्षभर उत्पादन विकण्यासाठी नियमित बाजारपेठ उपलब्ध नसते. ही अडचण दूर करण्यासाठी 'उमेद मॉल'ची संकल्पना राबविण्यात येत आहे. अंबरनाथच्या 'उमेद मॉल'मध्ये ठाणे जिल्ह्यातील महिला स्वयं-सहाय्यता समूहांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांना विक्रीची संधी मिळणार आहे. यामध्ये खाद्यपदार्थ, मसाले, पापड, लोणची, हस्तकला वस्तू, कपडे आणि इतर स्थानिक उत्पादनांचा समावेश असेल. यामुळे महिलांना आपल्या उत्पादनांची थेट ग्राहकांपर्यंत विक्री करता येणार असून, मध्यस्थांची भूमिका कमी होण्यास मदत होणार आहे. उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळाल्याने बचत गटांच्या उत्पन्नात वाढ होण्यासह ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे. महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाराही महिने बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यात टप्प्याटप्प्याने 'उमेद मॉल' उभारण्याची योजना आहे. पहिल्या टप्प्यात ठाणे-अंबरनाथसह १३ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. या केंद्रांमुळे बचत गटांच्या उत्पादनांना स्थानिक बाजारपेठेबरोबरच व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे महिला उद्योजकांना आपल्या उत्पादनांची गुणवत्ता, पॅकेजिंग आणि ब्रँडिंग सुधारण्यासही प्रोत्साहन मिळू शकते. 'उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला बचत गटांना केवळ आर्थिक सहाय्य किंवा प्रशिक्षण देण्यापेक्षा त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. उत्पादन तयार केल्यानंतर त्याची विक्री कुठे आणि कशी करायची, हा अनेक महिला उद्योजकांसमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. 'उमेद मॉल'च्या माध्यमातून या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. अंबरनाथ येथील प्रकल्पाला मिळालेली प्रशासकीय मान्यता त्यामुळे महिला बचत गटांसाठी महत्त्वाची मानली जात आहे. मॉल प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण महिलांनी तयार केलेल्या स्थानिक उत्पादनांना एकाच छताखाली बाजारपेठ मिळणार आहे. महिलांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि बचत गटांच्या माध्यमातून अधिकाधिक महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, या उद्देशाने 'उमेद मॉल' उभारले जात आहेत. महालक्ष्मी सरसच्या माध्यमातून दिलेला बाजारपेठेचा शब्द अंबरनाथमधील १९.९९ कोटी रुपयांच्या प्रकल्पातून प्रत्यक्षात उतरू लागला असून, या प्रकल्पामुळे ठाणे जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना वर्षभराची हक्काची बाजारपेठ उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## सुप्रिया सुळेंच्या जावयाच्या कंपनीवर सरकारी मेहेरबानी का?



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या जावयाच्या कंपनीला राज्य शासनाकडून तब्बल १२०० एकर मोक्याची सरकारी जमीन दिल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. कोणतीही खुली निविदा न काढता, सुरक्षा ठेव माफ करून अवघ्या दोन आठवड्यांच्या अंतराने दोन शासन निर्णय (GR) घाईघाईने कोणाच्या दबावातून काढले गेले, असा थेट सवाल उपस्थित करत दमानिया यांनी या संपूर्ण व्यवहारावर जोरदार आक्षेप घेतला आहे.सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सविस्तर मुद्दे मांडत अंजली दमानिया यांनी या प्रकल्पातील संशयास्पद अटी, दीर्घकालीन भाडेपट्टा आणि सरकारी जमिनीच्या परस्पर उपभाडेपट्ट्याबाबत (Sub-lease) अत्यंत टोकदार प्रश्न विचारून राज्य शासन आणि संबंधित कंपनीच्या कारभारावर बोट ठेवले आहे. प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित करताना अंजली दमानिया यांनी निदर्शनास आणून दिले. "जून महिन्यापर्यंत ही १२०० एकर सरकारी जमीन 'महाऊर्जा'मार्फत सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP तत्त्वावर) तत्त्वावर ग्रीन एनर्जी पार्क उभारण्यासाठी राखीव ठेवण्याचा शासन निर्णय होता. मात्र अवघ्या तीन महिन्यांत, म्हणजेच सप्टेंबरमध्ये, तीच जमीन थेट एकाच खासगी कंपनीला एकाधिकारशाहीने देण्याचा निर्णय का घेण्यात आला? हा धोरणात्मक बदल नक्की कोणाच्या सांगण्यावरून झाला? या बदलाचे कोणतेही ठोस कारण अधिकृत जीआरमध्ये नमूद केलेले नाही." "१२०० एकर जमीन आणि कोट्यवधी रुपयांचा हा महाप्रकल्प असताना खुली निविदा प्रक्रिया का राबवली गेली नाही? पारदर्शक टेंडर काढले असते, तर अनेक कंपन्यांनी स्पर्धा केली असती आणि त्यातून राज्य सरकारला अधिक महसूल व वाढीव भाडे मिळाले नसते का?" शासनाच्या अटी व शर्तीमधील कथित सवलतींवर टीका करताना दमानिया म्हणाल्या, "कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी कंत्राटदाराकडून नियमानुसार सुरक्षा ठेव घेणे अनिवार्य असते. मात्र या प्रकरणात थेट सुरक्षा ठेवच माफ करण्याचे औदार्य दाखवण्यामागे काय गौडबंगाल आहे? सुरुवातीला ४८ वर्षे आणि त्यानंतर पुन्हा ४८ वर्षांचा नूतनीकरणक्षम पट्टा (एकूण तब्बल ९६ वर्षे) थेट देण्याची गरज काय होती? सुरुवातीला ५ ते १० वर्षांची मुदत देऊन कामाची प्रगती तपासून पाहणे गरजेचे होते." जीआरमधील वादग्रस्त कलमांवर त्यांनी अत्यंत कडक शब्दांत आक्षेप नोंदवला. "संबंधित कंपनीला स्वतःच्या समूहातील इतर कंपन्यांना परस्पर उपभाडेपट्टा देण्याची मोकळीक देण्यात आली असून, त्यासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची (NOC) अटही शिथिल करण्यात आली आहे. हा सरकारी मालमत्तेच्या संरक्षणाशी खेळ आहे." "भविष्यात जर ही जमीन विकायची झाली, तर खरेदीचा पहिला हक्क संबंधित कंपनीचा राहील, अशी तरतूद कशासाठी? सरकारी जमीन ही जनतेची असून ती सरकारकडेच राहिली पाहिजे. तसेच उद्या जर सार्वजनिक हितासाठी ही जमीन सरकारला परत हवी असेल, तरीही कंपनीच्या परवानगीची अट का टाकण्यात आली आहे?" राज्याच्या आर्थिक स्थितीचा दाखला देत अंजली दमानिया यांनी सुप्रिया सुळे यांना थेट आवाहन केले. "या १२०० एकर जमिनीवर खासगी सौरऊर्जा प्रकल्प उभारून सामान्य जनतेला अत्यंत स्वस्त किंवा सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून दिली जाणार आहे का?

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## माजी मंत्री श्री. शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या जन्मदिनानिमित्त एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**पाटोदा (प्रतिनिधी) :** जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा आणि लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय, विसरवाडी, ता. नवापूर, जि. नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करार अंतर्गत इंग्रजी विभागाची 'Future Ready English : Communication and Employability Skills' या विषयावर एकदिवसीय ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. माजी मंत्री तथा संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव दादा पंडित यांच्या ८९व्या वाढदिवसानिमित्त ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय, विसरवाडीच्या प्राचार्य डॉ. जयश्री एम. गावित यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. जशिप्र मंडळाचे श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गढीचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांची विशेष उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जशिप्र मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते.प्राचार्य डॉ. जयश्री एम. गावित यांनी कार्यशाळेचे उद्घाटन करताना विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा आत्मविश्वासाने वापर करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि व्यावसायिक कौशल्यांचा विकास करावा, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. विश्वास कदम, विशेष उपस्थिती म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले, बदलत्या काळात इंग्रजी भाषा, संवादकौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले.प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रभावी संवादकौशल्य व रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ कर्नाटक, कलबुर्गी येथील इंग्रजी व परकीय भाषा विभागाचे प्रा. डॉ. अनिल बी. कांबळे यांनी 'Communication Skills for the Future Workplace' या विषयावर मार्गदर्शन केले. भविष्यातील कार्यक्षेत्रात प्रभावी संवादाचे महत्त्व, आत्मविश्वासाने विचार मांडणे आणि व्यावसायिक संवादकौशल्ये याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.दुसऱ्या सत्रात केसीई सोसायटीचे मूलजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील प्रा. डॉ. पंडित चव्हाण यांनी 'English and Employability Skills' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेच्या ज्ञानासोबतच रोजगारासाठी आवश्यक असलेली संवादकौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, सादरीकरण कौशल्य, आत्मविश्वास व आंतरवैयक्तिक कौशल्ये विकसित करावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यशाळेत शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दोन्ही सत्रांनंतर प्रश्नोत्तर व संवादातून सहभागींच्या शंकांचे निरसन करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.विनोद किर्दक यांनी केले, तर आभार प्रा.संतोष धनेधर यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शशिकांत मोरे व प्रा. अण्णासाहेब मुळे यांनी करून दिला. प्रा.डॉ.सुनील जाधव,प्रा.सोमनाथ घाडगे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी दोन्ही महाविद्यालयांच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक व प्रा.संतोष धनेधर यांनी परिश्रम घेतले.या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी संवादकौशल्ये आणि रोजगाराभिमुख कौशल्यांचे महत्त्व समजून घेण्यास तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींसाठी स्वतःला तयार करण्यास उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.






## नाना पाटेकर यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा




नाना पाटेकर नुसते चित्रपट अभिनेते नव्हते तर एक अत्यंत संवेदनशील सामाजिक कार्यकर्तेही होते.या निमित्त त्यांच्या बद्दलची एक आठवण या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करत आहे.गोष्ट खूप जुनी आहे साधारणपणे 38 वर्षापूर्वीची. माझ्या आठवणी प्रमाणे 1988 साली केंद्रशासनाने संपूर्ण देशात व राज्यात राष्ट्रीय साक्षरता अभियान कार्यक्रमांतर्गत अगदी मोठ्या शहरातील झोपडपट्ट्या पासून ते छोट्या गावातील अगदी वाड्या वस्तीतील निरक्षर लोकांना दोन टप्प्यात साक्षर करण्याचा अत्यंत महत्त्वकांक्षी कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणात राबवला होता. त्यावेळी मी पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात 1980 ते 1995 दरम्यान प्राणीशास्त्र विषयाचा प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणून काम करत होतो. महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय साक्षरता अभियान कार्यक्रम राबवण्यासाठी औरंगाबाद जिल्ह्याची जबाबदारी माननीय श्री. गोविंदभाई श्राफ त्यांच्यावर सोपवली होती तर औरंगाबाद जिल्हा राष्ट्रीय साक्षरता अभियान वातावरण निर्मिती प्रमुख म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे नाट्यशास्त्र विभाग प्रमुख व वऱ्हाड निघाले लंडनला फेम डॉ. लक्ष्मण देशपांडे यांच्यावर सोपवली होती आणि पैठण तालुका साक्षरता अभियान वातावरण निर्मिती प्रमुख म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली होती.औरंगाबाद जिल्ह्यात साक्षरता अभियान वातावरण निर्मिती करण्यासाठी पथनाट्य, कीर्तन , भारुड, लघु नाटिका, गाणी, पोवाडे इत्यादींच्या माध्यमातून काम करायचे ठरले. त्यासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय साक्षरता अभियान तालुका वातावरण निर्मिती प्रमुख तसेच कीर्तनकार, भारूडकार ,विद्यार्थी कलाकार यांना प्रशिक्षण देण्यासाठी औरंगाबाद येथे केंद्रीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात यावे व त्याचे उद्घाटनासाठी सिने अभिनेते नाना पाटेकर यांना निमंत्रित करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. त्यानुसार डॉ. लक्ष्मण देशपांडे यांनी नाना पाटेकर यांच्याशी संपर्क साधला व नाना पाटेकरांनीही निमंत्रण स्वीकारले.साक्षरता अभियान हे राष्ट्रीय व सामाजिक कार्य असल्याने मी यासाठी कोणतेही मानधन घेणार नाही असेही त्यांनी सांगितले. साक्षरता अभियान प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनासाठी सिने अभिनेता नाना पाटेकर येणार असे समजल्यामुळे दरम्यानच्या काळात औरंगाबाद येथे नव्यानेच बांधलेल्या एका सिनेमागृहाचे उद्घाटनासाठी सिनेमागृहाच्या मालकाने त्यांना निमंत्रित केले. त्यासाठी सिनेमागृहाच्या मालकाने त्यांना रुपये चाळीस हजार एवढे मानधन दिले. परंतु नाना पाटेकर यांनी सदर रक्कम स्वतःकडे न ठेवता ती संपूर्ण रक्कम अत्यंत मोठ्या मनाने साक्षरता अभियान कार्यक्रमाला त्यांच्या तर्फे योगदान म्हणून दिली. त्याकाळी चाळीस हजार रुपये म्हणजे फार मोठी रक्कम होती.एवढा मोठा आणि सुप्रसिद्ध अभिनेता असून सुद्धा मराठी व हिंदी चित्रपटात काम करत त्यांनी सातत्याने अगदी शेवट च्या क्षणापर्यंत सामाजिक बांधिलकी जपली. नाम फाउंडेशनच्या वतीने नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे या दोन प्रख्यात सिने कलावंतांनी महाराष्ट्रातील आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबीयांना वेळोवेळी आर्थिक मदत केली तसेच दुष्काळग्रस्त भागातील जलसंधारण व जलसंवर्धनाची अनेक कामे करून शेतकऱ्यांना मदत केली हे आपल्या सर्वांनाच माहीतच आहे. कोणाचीही तमा अथवा भीती न बाळगता अत्यंत परखडपणे आपले विचार मांडणारा एक सामाजिक कार्यकर्ता व उत्कृष्ट अभिनेता आज आपण गमावला आहे याचे दुःख सर्वांनाच आहे . त्यांना महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो .

**प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख अध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्राचार्य महासंघ, पुणे**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## मराठवाड्यातील चार जिल्ह्याची 'ऑन फिल्ड ' पाहणी करणार

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी राज्य शासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने कार्यवाही सुरू ठेवली आहे. दुष्काळग्रस्त भागातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्राचे आंतरमंत्रालयीन पथक (Inter-Ministerial Central Team) उद्यापासून महाराष्ट्राच्या विविध भागांचा तीन दिवसांचा दौरा करणार आहे. ८ ते १० ऑक्टोबरदरम्यान तीन पथके पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त व पर्जन्यतूटग्रस्त भागांची पाहणी करणार आहेत. या पाहणीमुळे पिकांची स्थिती, पर्जन्यमानातील तूट, भूजलपातळी आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता यांचा प्रत्यक्ष आढावा घेता येणार आहे. राज्य शासनाने दुष्काळाच्या परिस्थितीकडे केवळ प्रशासकीय बाब म्हणून न पाहता शेतकरी आणि ग्रामीण जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याला प्राधान्य दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,सुनेत्राताई पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील विविध सदस्यांनी यापूर्वीच राज्यातील विविध भागांचा प्रत्यक्ष दौरा करून दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी केली आहे. स्थानिक प्रशासन, शेतकरी आणि नागरिकांशी संवाद साधून परिस्थितीची माहिती घेण्यासोबतच आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शासनस्तरावरून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. केंद्राच्या पथकांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर ८ ऑक्टोबर रोजी मुंबईत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक होणार आहे. या बैठकीत पावसातील तूट, कोरडे कालखंड, पिकांच्या नुकसानीचे मूल्यांकन, भूजलपातळीतील घट, तसेच पिण्याच्या पाण्याची टंचाई याबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF) अंतर्गत राज्य शासनाने सादर केलेल्या मदतीच्या मागणीबाबतही चर्चा होणार आहे. महसूल, कृषी, जलसंपदा आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीस उपस्थित राहणार आहेत.मराठवाड्यातील पथक छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यांतील पर्जन्यतूटग्रस्त व दुष्काळसदृश्य भागांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. ९ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यातील विविध भागांची पाहणी केल्यानंतर पथक बीड जिल्ह्यातील अनेक भागांना भेट देणार आहे. १० ऑक्टोबर रोजी बीड जिल्ह्यातील आणखी काही भागांची पाहणी करून जिल्हाधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक होणार आहे. दुष्काळाच्या काळात शेतकरी आणि दुष्काळाच्या छायेतील नागरिकांना आवश्यक मदत वेळेत मिळावी, यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या यंत्रणांमध्ये समन्वय राखून परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. प्रत्यक्ष क्षेत्रातील वस्तुस्थिती जाणून घेऊन त्याआधारे मदत व उपाययोजनांचे नियोजन करण्यावर शासनाचा भर आहे.






## कवितेमुळे पुनर्जन्म लाभला म्हणूनच मी कवितेला आईच संबोधतो : कवी प्रा.वा. ना.आंधळे




**त्र्यंबकेश्वर :** माझ्या आईच्या पोटी मी जन्मलो अन जगाचे दर्शन झाले.ऐन तारुण्यात माझा कवितेच्या पोटी जन्म झाला अन जग मला ओळखू लागले.आईने बोट धरून चालणं शिकवलं तर कवितेने बोट धरून बोलणं शिकवलं.आई आशीर्वाद देतांना म्हणायची औक्षवंत हो! कविता आशीर्वाद देतांना म्हणायची मी तुला चिरंजीव करीन.मित्रहो,कवितेनं भरभरून ओळख दिली.शालेय अभ्यासक्रमापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमात कवितेनेच मला मिरविले.आपल्या सारख्या श्रोत्यांपासून सातासमुद्रापार असलेल्या वाचकांपर्यंत पोहचवले.मातृप्रेम यापेक्षा आणखी काय वेगळे असते.म्हणून मी तिला आईच संबोधतो. शिवचरण उज्जैनकर फाऊंडेशन, मुक्ताईनगर जिल्हा जळगाव आयोजित दि. ३ व ४ऑक्टोबर२०२६ या दोन दिवशीय चौथ्या अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलनात त्र्यंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज साहित्य नगरी व आदिशक्ती संत मुक्ताई व्यासपीठ संत निवृत्तीनाथ महाराज समाधी मंदिर शेजारी भव्य सभागृहात ते कवी संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते.संभाजीनगर येथील उज्जैनकर फाऊंडेशनचे राज्य अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. सुभाष बागल यांचे अध्यक्षतेखाली संमेलन नुकतेच भव्य आणि दिव्य स्वरूपात संपन्न झाले. याया संमेलनातील भव्य ग्रंथ दिंडी सर्वांचेच आकर्षण ठरले यामध्ये संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांना आदिशक्ती संत मुक्ताई कडून भव्य आणि दिव्य हार सर्वांच्या उपस्थितीत अर्पण करण्यात आला हे या संमेलनाचे विशेष आकर्षण ठरले. एरंडोल जिल्हा जळगाव येथील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा.ना.आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन सुद्धा भन्नाट गाजले या प्रसंगी व्यासपीठावर फाऊंडेशनचे कोल्हापूर येथील डॉ.मारुती गुरव अकोला येथील ज्येष्ठ साहित्यिक श्री तुळशीराम बोबडे श्री वासुदेव खोपडे अमरावती येथील प्रा.डॉ.मंदा नांदुरकर श्री संजय ठोसर फाऊंडेशनचे बार्शी जिल्हा सोलापूर येथील कवी अशोक मोहिते, प्राचार्य डॉ.पंढरीनाथ शेळके, आळंदी येथील सौ.रूपाली चिंचोलकर सांगली येथील सौ.मेघा पाटील बेळगाव कर्नाटक येथील प्रा.विनायक पाटील पुण्यातील श्री जगन्नाथ बुडूखले गुरुजी खामगाव येथील श्री पांडुरंग दैवज्ञ श्री शंकरराव अनासुने श्री बाळु भाऊ इटणारे साखरखेडा येथील कवी रामदास कोरडे आदी मान्यवर प्रमुख म्हणून उपस्थिती व्यासपीठावर उपस्थित होते याप्रसंगी नाशिक येथील डॉ. रमाकांत जाधव डॉ. श्यामकुमार दुसाने जळगाव येथील श्री मधुकर पोतदार भुसावळ येथील ज्ञानेश्वर घुले,नांद्रा येथील कवी स्वप्नील पाटील, एरंडोल येथील श्री निंबा बडगुजर धाराशिव येथील डॉ. मधुकर हुजरे शिरपूर येथील श्री अरविंद भामरे धुळे येथील प्रा.अश्विन अमृतकर, धुळे येथील श्रीमती रंजना पवार बदलापूर येथील श्री रमेश उज्जैनकर बुलढाणा येथील श्री डी.आर. बांगर कोल्हापूर येथील श्री प्रवीण सूर्यवंशी प्रा.डॉ.सविता व्हटकर, प्रा.आरती लाटणे, श्री सातापा सुतार लातूर येथील श्री गुरु हराळे बेळगाव कर्नाटक येथील श्री शांताराम भादवणकर पुणे येथील श्री जगन्नाथ बुडूखले सौ.धनश्री म्हेत्रस, आदी कवी व कवयित्रींनी या कवी संमेलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला उज्जैनकर फाऊंडेशनचे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील तसेच गोवा, कर्नाटक, गुजरात राज्यातील कवींनी आपल्या कविता सादर करून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन फाऊंडेशनच्या धुळे जिल्हा उपाध्यक्षा सौ.प्रीती नंदलाल मोरे व फाऊंडेशनच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्षा सौ. सारिका जोशी यांनी केले त्याप्रसंगी शेवटी या कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांनी सुद्धा आपली कविता सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. प्रा.आंधळे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,कविता जन्माला आली अन जगण्याला मोल आले.दृष्टी आणि सृष्टी सुंदर झाली.कविता ही भेदाच्या पलीकडे नांदत असल्यामुळे व वयाच्याही मर्यादा तिला आड येत नसल्यामुळे जगाचे मातृपद कवितेकडे जाते.या विधानाची सार्थकता माऊलीच्या पायासदनाचे उदाहरण देत त्यांनी श्रोत्यांपुढे कवितेची थोरवी कथन केली.याबरोबरच संमेलनाच्या एकूणच आयोजन नियोजनावर भाष्य करतांना ते म्हणाले ,हे चौथे अखिल भारतीय शिव मराठी साहित्य संमेलन गेल्या दोन दिवसापासून विविध उपक्रमांनी व विविध जिल्ह्यातून,राज्यातून आलेल्या साहित्यिक, रसिकांची दाद मिळवून गेले. या संमेलनाच्या यशाचे श्रेय उज्जैनकर फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा या संमेलनाचे मुख्य आयोजक डॉ.शिवचरण उज्जैनकर यांना व त्यांच्या सर्व कुटुंबीयांना तसेच नातेवाईकांना आणि फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांना जाते.या भावशब्दात एकूणच साहित्य संमेलनाविषयी कृतज्ञता कवी संमेलनाध्यक्ष प्रा.वा. ना.आंधळे यांनी उपस्थितांसमोर नोंदवली.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## कालिकादेवी विद्यालयात 'श्री कालिका पॅटर्न परीक्षा' संपन्न



**शिरूर कासार :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचालित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे,विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दरवर्षी राबविण्यात येत असलेला 'श्री कालिका गुणवत्ता पॅटर्न' यानुसार चालू शैक्षणिक वर्षामधील इयत्ता ५ वी ते १२ वी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची आणि सर्वच विषयाची नियमित होणारी 'श्रीकालिका पॅटर्नची परीक्षा' घेण्यात आली.आधुनिक युगात विविध क्षेत्रात गुणवत्ता चाचणी परीक्षा घेतली जाते.अशा परीक्षेला विद्यार्थ्यांना अनेक वेळा सामोरे जावे लागते.त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करता एक दूर दृष्टिकोन लक्षात घेऊन भविष्यात सीईटी, जेईई, नीट, नर्सिंग, आयसर, बाल वैज्ञानिक, डिप्पर, ऑलिंम्पियाड, शिष्यवृत्ती,सैन्य भरती, पोलीस भरती तसेच पदवीनंतर अभ्यासक्रमासाठीची सीईटी, सेट-नेट, पेट, टीईटी, पीएच.डी.,एमपीएससी, यूपीएससी, आयपीएस,आयएएस इत्यादी स्पर्धा परीक्षेच्या धरतीवर 'श्री कालिका पॅटर्न'ची परीक्षा घेतली जाते.गेल्या वर्षी या उपक्रमामुळे शिरूर तालुक्यात व पंचक्रोशीत सर्वत्र कौतुक झाले.विद्यार्थ्यांनी पण विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविले.त्यामुळे आदर्श शिक्षण संस्थेचा विभागीय पातळीवर लौकिक वाढत गेला.म्हणून यावर्षी प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांना शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित 'श्री कालिका पॅटर्नची परीक्षा' प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या निरीक्षणाखाली सुरळीत पार पडली.या परीक्षेतून गुणवत्तापूर्ण विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात येणार आहेत.या परीक्षेसाठी विद्यालयातील उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, परीक्षा प्रमुख, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, विषय शिक्षक, कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

## अकोली शिवारात तिर्रट जुगारावर LCBची धाड



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** बी.डी.रामपूरकर जिंतूर तालुक्यातील मौजे अकोली शिवारात दिनांक ३ ऑक्टोबर २०२६ रोजी या गावालगतच्या स्मशानभूमीचे बाजूला मोकळ्या जागेत तिर्रट जुगार पत्त्याचा डाव खेळत बसणाऱ्या सहा आरोपींना परभणीच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने धाड मारून जिंतूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे फिर्यादी अनिल तुळशीराम राठोड वय ४० वर्ष पोलीस हेड कॉन्स्टेबल/३६० यांच्या फिर्यादीवरून आरोपी (१)अशोक गणपतराव वाकळे वय ४८ वर्षे रा. बौद्ध नगर जिंतूर ,(२)अनंता लक्ष्मणराव वाकळे वय ३५ वर्षे रा. हुतात्मा स्मारक जिंतूर,(३)विठ्ठल सडाळ रा. अकोली,(४)संतोष ठोंबरे रा. भोसी,(५)रवी अंभोरे रा. अकोली,(६)शकील पठाण रा. जिंतूर हे सहा इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तिर्रट नावाचा पत्याचा जुगाराचा खेळ खेळत बसलेअसताना त्यांचा जवळून तीन मोटर सायकल व मोबाईल नगदी रक्कम मिळून असे ३,०३,४५० रुपये मुद्देमाल जप्त करून त्यांच्याविरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून पोलीस निरीक्षक नामदेव रेड्डी यांच्या आदेशाने पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल/९८८ वाटोडे यांच्याकडे देण्यात आला आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** सेवा संकल्प अभियानांतर्गत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी माथुर मॅडम, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर किशोर सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली मा. गटविकास अधिकारी श्री. मानकर सर, मा. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव तसेच मा. वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय मस्के सर,सहाय्यक गट विकास अधिकारी भोसले सर यांच्या अधिपत्याखाली पंचायत समिती कार्यालय जिंतूर व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, जिंतूर व ग्रामीण रुग्णालय जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वेच्छा रक्तदान शिबिराचे ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे आयोजन करण्यात आले.या रक्तदान शिबिरास अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकूण 40 अधिकारी व कर्मचारी यांनी रक्तदान देऊन सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हे महत्त्वाचे सामाजिक कार्य असून, गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी गरज आहे.शिबिर यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागातील विनोद राठोड, दत्तात्रय कौटकर, दिलीप राठोड, मिरा देशमुख, विजय ढगे, महंमद नजीब व RBSK अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले.

## इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंची जिल्हास्तरीय स्पर्धेत पदकांची दणदणीत कमाई!

**जळगाव :** जिद्द, मेहनत आणि अचूक प्रशिक्षणाच्या जोरावर इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंनी जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धेत आपली छाप उमटवली.कोकीळ गुरुजी मनपा जलतरण तलाव, जळगाव येथे झालेल्या शालेय उर्वरित जिल्हा जलतरण, डायव्हिंग व वॉटर पोलो स्पर्धा २०२६-२७ मध्ये इकराच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत अनेक पदकांवर आपले नाव कोरले.अंडर-१४ गटात झकेरिया हिदायत खाटीक याने जबरदस्त कामगिरी करत १०० मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्णपदक, ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्यपदक आणि ५० मीटर बटरफ्लायमध्ये कांस्यपदक पटकावले.तीन पदकांची ही शानदार कामगिरी करत त्याने विभागीय स्तरावर आपली दावेदारी मजबूत केली.अंडर-१७ गटातही इकराच्या जलतरणपटूंनी आपला दबदबा कायम ठेवला.तहा सोहेल खान याने २००, ४०० आणि ८०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रौप्यपदकांची कमाई केली.याह्या हिदायत खाटीकने ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये सुवर्णपदक, तर ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये कांस्यपदक मिळवले.सरोश शेख शकील यानेही ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये कांस्यपदक पटकावत संघाच्या पदकतालिकेत भर घातली.या यशामुळे इकरा पब्लिक स्कूलच्या जलतरणपटूंनी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली जागा भक्कम केली आहे.खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशामागे क्रीडा शिक्षक आमिर खान यांचे नियोजनबद्ध प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि खेळाडूंची अथक मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे.इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.करीम सालार,जनरल सेक्रेटरी एजाज मलिक आणि प्राचार्य शेख शकील यांनी विजयी जलतरणपटू, क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.तसेच आगामी विभागीय स्पर्धेतही इकराचे खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा नावलौकिक उंचावतील,असा विश्वास व्यक्त करत सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत विलासराव देशमुख शाळेचा अंडर.17 व. अंडर 19 मध्ये शानदार विजय



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुका क्रीडाविभाग वतीने आयोजित तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत शाळेने आपली परंपरा कायम राखून सलग चौथ्या वर्षी तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेत दोघा गटात पहिला क्रमांक मिळवून जिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र ठरलेला आहे. संघाने अंडर १७ ची अंतिम सामन्यात संघाने जवाहर विद्यालय संघाचे पराभव करत पहिला क्रमांक पटकावला या सर्व स्पर्धेत उमर अबुबकर चाऊस या खेळाडूस उत्कृष्ट खेळाडूचा बहुमान देण्यात आला तसेच अंडर.१९ च्या अंतिम सामन्यात संघाने आडगाव संघाचा पराभव करत स्पर्धा जिंकली अयान खान या खेळाडूला उत्कृष्ट खेळाडूचा बहुमान देण्यात आला..या सर्व खेळाडूंना शाळेचे क्रीडाविभागप्रमुख मेराज सिद्दीकी सर आणि सहाय्यक कोच सोहेल खान सर यांनी मार्गदर्शन केले हे सर्व कामगिरी मुख्याध्यापक अहमद सिद्दिकी सर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली या यशा बद्दल शाळेचे अध्यक्ष काजी आसेफोदीन सिद्दीकी साहेब तसेच उपाध्यक्ष काजी वासेफोदीन सिद्दीकी साहेब यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

## जिंतूर तालुक्यातील कान्हा शिवारात गांजाची लागवड; ८.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील कान्हा शिवारातील गट क्रमांक ३० मध्ये हळदीच्या पिकात लपवून बे कायदेशीरपणे गांजाची लागवड केल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा, परभणी व बामणी पोलिसांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. ही कारवाई ६ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार शेतात छापा टाकला असता संतराम त्र्यंबक दुबळकर (वय ४५, व्यवसाय शेती, रा. कान्हा जिंतूर) यांच्या ताब्यातील शेतात हळदीच्या पिकामध्ये लपवून ठेवलेली गांजाची ९ झाडे आढळून आली. तसेच पांढऱ्या, हिरव्या व पिवळ्या खताच्या पिशव्यांमध्ये एकूण १६.४५५ किलो गांजा आढळून आला. जप्त गांजाची अंदाजे किंमत ८ लाख २२ हजार ७५० रुपये आहे.याप्रकरणी बामणी पोलीस ठाण्यात एएसआय नितीन सुधाकर वडकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक १७०/२६, एनडीपीएस कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रभोधन जोंधळे करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत ( आयपीएस) यांच्या आदेशाने व अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, बामणीचे एपीआय मनोज सुरवाडे, पोउपनि चंदनसिंह परिहार तसेच दोन्ही पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केली.

# आर्थिक साक्षरतेसोबत आर्थिक शिस्तही आत्मसात करावी : डॉ. संजय अस्वले




**उमरगा :** आजच्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पदवी व शैक्षणिक ज्ञान मिळविणे पुरेसे नाही, तर दैनंदिन जीवनातील आर्थिक व्यवहारांचे ज्ञान आत्मसात करण्याबरोबरच आर्थिक शिस्तही अंगीकारणे आवश्यक आहे. पैसा कमावणे, त्याचे योग्य नियोजन, बचत, गुंतवणूक आणि सुरक्षित डिजिटल व्यवहार याबाबत विद्यार्थ्यांनी लहान वयातच जागरूक झाले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. ते काल गुरुवार दिनांक आठ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' अंतर्गत फायनान्स क्लबच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.फायनान्स क्लबच्या अध्यक्षपदी खान मसरूद्दीन, तर सदस्य म्हणून शिंदे प्रतीक्षा, सास्तुरे करीना, गायकवाड अर्चना आणि शेख जावेद यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण करण्याच्या उद्देशाने या क्लबच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.डॉ. अस्वले पुढे म्हणाले, डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ओटीपी, यूपीआय पिन, एटीएम पिन, संकेतशब्द यांसारखी गोपनीय माहिती कोणाशीही शेअर करू नये. आकर्षक ऑफर किंवा झटपट नफ्याच्या आमिषाला बळी न पडता योग्य माहिती घेऊन आर्थिक निर्णय घेण्याची सवय विद्यार्थ्यांनी विकसित करावी. फायनान्स क्लब हा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जीवनातील आर्थिक निर्णय घेण्यासाठी सक्षम करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरेल.फायनान्स क्लबच्या माध्यमातून राष्ट्रीय वित्तीय शिक्षण केंद्राचे वित्तीय साक्षरता प्रमाणपत्र, वित्तीय प्रश्नमंजुषा, 'गरज की इच्छा?' पोस्टर स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या खर्चाच्या सवयींचे सर्वेक्षण, यूपीआय व एटीएम सुरक्षा प्रात्यक्षिक, सायबर फसवणुकीविरोधी पथनाट्य, बँक व पोस्ट कार्यालय भेट, नमुना एसआयपी गुंतवणूक प्रात्यक्षिक, विमा व आर्थिक फसवणूक विषयक तज्ज्ञ मार्गदर्शन तसेच '३० दिवसांत १,००० रुपयांची बचत' यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना बचत, अर्थसंकल्प, बँकिंग, डिजिटल पेमेंट, गुंतवणूक, एसआयपी, विमा, आर्थिक जोखीम आणि सायबर फसवणूक याबाबत कृतीआधारित प्रशिक्षण देण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उमरगा तालुका करिअर कट्टा समन्वयक डॉ. समाधान पसरकल्ले, महाविद्यालयीन समन्वयक डॉ. चंद्रसेन करे आणि डॉ. अर्जुन कटके यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, करिअर संसदेचे पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करियर संसद मुख्यमंत्री पूजा हांडे यांनी केले तर आभार प्रतीक्षा शिंदे यांनी मानले


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## आशेचा हिरवा कोंब

ओंजळीतून निसटून जावी
वाळू नर्मदेची अलगद
तसे निघून गेले क्षण
आयुष्याच्या सकाळचे सोनेरी..

अन् स्वप्नं ही हरवून गेले
ऊन डोईवर तापल्याने..आताशा..

आता स्वप्नं अन् वास्तवाची
भेट होत नाही
स्टेशन कधीचेच चुकल्याने..

आता वाढलंय वय
वाकले खांदे
जबाबदारीच्या असह्य ओझ्याने..

पाठीवरचे आधाराचे हात ही
निघून गेले दिगंताच्या प्रवासाला..

आता डोक्यावरचे केसही
सोडू लागले साथ
ऊन कलल्याने..

म्हणून सुचत नाही कविता
हिरव्या दिवसावर..

तरीही जपतो आहे
उरात आशेचा हिरवा कोंब
माझ्या वैराण वाळवंटाला
दान हिरवाईचं देण्यासाठी..



ज्ञानेश्वर गायके, कन्नड

## सिनेसृष्टीतील तारा आणि सामाजिक परखड व्यक्तीमत्त्व काळाच्यापल्याड नाहिसा

नटसम्राट नाना पाटेकर यांच्या अकाली निधनाने एक उत्तम अभिनेता आणि सामाजिक भान असलेला लोकप्रिय कलाकार गमावल्याची भावना सर्वत्र व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचं वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. मराठी सिनेसृष्टीसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवलेल्या नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह महाराष्ट्रावरही शोककळा पसरली आहे. नानांच्या रुपाने प्रतिभावंत कलाकारासह सामाजिक भान असलेले उमदे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. कलाकार सामाजिक, राजकीय भूमिका घेत नसल्याचा आक्षेप वारंवार घेतला जातो. मात्र नाना पाटेकर हे नेहमीच याला अपवाद राहिले. नाना पाटेकर यांना गोव्यातील दोना पावला येथील घरी हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतर त्यांना उपचारासाठी तातडीने मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे डॉक्टरांनी त्यांना ४५ मिनिटे 'कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) अर्थात हृदय व फुफ्फुसांचे पुनरुज्जीवन' देऊन त्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र उपचारांदरम्यान पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. नाना पाटेकर यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर आहे. हे नाव फार थोड्या लोकांना माहीत आहे. त्यांचे वडील गजानन पाटेकर व्यापारी होते, तर आई निर्मला पाटेकर गृहिणी होत्या. नाना पाटेकर यांना अशोक आणि दिलीप पाटेकर असे दोन भाऊ आहेत. त्यांच्या पत्नीचे नाव नीलकंती पाटेकर असून त्या बँक अधिकारी होत्या. नाना पाटेकर यांना दोन मुले, मात्र त्यापैकी एका मुलाचे दुर्दैवाने निधन झाले, तर मल्हार नावाचा मुलगा आहे. चित्रपटसृष्टीमध्ये ते नाना पाटेकर या नावाने परिचित झाले होते. व्यक्तिमत्त्वातील जरब, जबरदस्त संवादफेक या बळावर त्यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं. नाना पाटेकर यांनी मुंबईत राहून शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांची शाळा समर्थ विद्यालय होती. त्यानंतर त्यांनी वांद्रे स्कूल ऑफ आर्टमध्ये (आताचे एल.एस. रहेजा स्कूल ऑफ आर्ट) शिक्षण घेतले आणि सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधून पदवी घेतली आहे. चित्रपट क्षेत्रात नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये 'गमन' या सिनेमातून पदार्पण केले. त्यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या अभिनयाला तीन राष्ट्रीय पुरस्कार, दोन फिल्मफेअर पुरस्कार मिळाले असून २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. याशिवाय अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान त्यांच्या नावावर आहेत. प्रहार चित्रपटाच्या तयारीसाठी तीन वर्षांच्या प्रशिक्षण कालावधीनंतर नाना यांना १९९० मध्ये भारतीय प्रादेशिक सैन्यात मानद कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले आणि त्यांनी जनरल व्ही.के. सिंग यांच्यासोबत काम केले, ज्यांच्याकडे त्यावेळी कर्नलची रँक होती आणि त्यांचा एक कॅमिओ होता. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, नाना पाटेकर यांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटमध्ये मानद मेजर म्हणूनही सेवा दिली आहे. नाना पाटेकर यांनी अभिनयासोबत सामाजिक क्षेत्रामध्येही आपल्या कार्याची छाप पाडली होती. त्यांनी नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून शेतक-यांसाठी सामाजिक कार्य सुरु केले होते. समाजातील वंचित घटकांसाठी, प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मोठे सामाजिक कार्य केले आहे. सप्टेंबर २०१५ मध्ये अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्यासह त्यांनी नाम फाउंडेशन या संस्थेची स्थापना केली. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा (लातूर, उस्मानाबाद) परिसरातील दुष्काळ आणि कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांना त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन आर्थिक मदत केली. दुष्काळमुक्तीसाठी गावांमध्ये नद्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि जलसंधारणाची विविध कामे व बंधारे बांधण्याचे मोठे प्रकल्प 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून राबवले. शेतकरी कुटुंबातील गरीब मुलींच्या विवाहासाठी आर्थिक हातभार लावणे तसेच आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलणे ही कामे केली. बिहारमधील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 'अनुभूती' या संस्थेद्वारे निधी दिला. तसेच 'पाठशाला या चित्रपटाचे मानधन आणि राज कपूर पुरस्काराची १० लाख रुपयांची संपूर्ण रक्कम त्यांनी महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासाठी दान केली. ते आपल्या मिळकतीचा मोठा वाटा सामाजिक कार्यासाठी व मदतीसाठी वापरत असत. अशा या ज्येष्ठ अभिनेत्याच्या निधनाचे दु:खद वृत्त अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टीतील एक असामान्य, संवेदनशील आणि प्रभावी पर्व आज संपले आहे. आपल्या दमदार अभिनयाने, आगळ्या संवादफेकीने आणि प्रत्येक भूमिकेतील विलक्षण सहजतेने त्यांनी रसिकांच्या मनावर कायमची अमिट छाप उमटवली. परिंदा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम, पक पक पकाक, देऊळ, नटसम्राट अशा अनेक चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाचे विविध पैलू रसिकांना अनुभवायला मिळाले. कलाकार म्हणून यशस्वी असतानाच सामाजिक प्रश्नांप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून केलेली कृतिशील समाजसेवा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा तितकाच प्रेरणादायी पैलू होता. त्यांच्या निधनाने भारतीय कलाविश्वाने एक संवेदनशील आणि प्रतिभावान कलाकार, तर समाजाने एक कृतिशील व सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या अभिनयाची, विचारांची आणि सामाजिक कार्याची अमिट छाप सदैव स्मरणात राहील.

**सुनील शिरपुरे कमळवेल्ली, यवतमाळ भ्रमणध्वनी- ७४९८८८५०६१**


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १० वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६

# साधेभोळे... पण मनाने श्रीमंत

एकदा एका कार्यक्रमासाठी सांताक्रूझला गेलो होतो. कार्यक्रम संपल्यानंतर बाहेर आलो आणि रस्त्याच्या कडेला बसलेल्या काही माणसांकडे सहज लक्ष गेले. पहिल्या नजरेत ती माणसं अगदी साधीभोळी वाटली; अंगावर साधे कपडे, पायात पन्नास-साठ रुपयांची चप्पल, हातात एखादी फडकी किंवा जुनी पिशवी, समोर मांडलेल्या काही भाज्या, फळं, घरगुती वस्तू आणि त्यामागे उभं असलेलं संपूर्ण आयुष्य... त्यांच्याकडे पाहताना जाणवलं की ही माणसं लाखो रुपये कमवण्यासाठी शहरात आलेली नाहीत, त्यांच्याकडे मोठं दुकान नाही, मोठी गुंतवणूक नाही, मोठी स्वप्नंही नसतील कदाचित; त्यांचं स्वप्न अगदी छोटंसं आहे—आज संध्याकाळी घरी जाताना दोन वेळच्या भाकरीसाठी पीठ, थोडं तेल, मीठ, मिरची, एखाद्या मुलासाठी थोडं खायला आणि उद्याच्या दिवसासाठी पुन्हा जगण्याची थोडीशी आशा घेऊन घरी जाता यावं. एखाद्या घरातून ऋतूप्रमाणे आलेली फळं, शेतातून आणलेल्या भाज्या, घरात बनवलेल्या छोट्या वस्तू किंवा रोजच्या वापरातील साध्यासुध्या गोष्टी घेऊन ही माणसं शहरात येतात. कधी सात किलोमीटर, कधी दहा किलोमीटरचा प्रवास करतात; बसचे पैसे वाचवण्यासाठी काही अंतर चालत येतात; दिवसभर उन्हात, पावसात, धुळीत, वाहतुकीच्या गोंगाटात बसतात आणि संध्याकाळी हातात तीनशे-चारशे रुपये पडले तरी त्यांना तो दिवस मोठा यशस्वी वाटतो. पण त्या तीनशे-चारशे रुपयांच्या कमाईतूनही सगळे पैसे त्यांच्या हातात राहत नाहीत. महानगरपालिकेची पावती, जागेचा खर्च, पोलिसांची भीती, स्थानिक गुंडांचा हप्ता, घराचा खर्च आणि त्यात मुलांचं शिक्षण, औषधं, किराणा... एवढ्या सगळ्या जबाबदाऱ्यांमध्ये उरलेले दोन-चार रुपये म्हणजे त्यांच्यासाठी श्रीमंती असते. आपण मात्र त्यांच्या समोर उभे राहून वीस रुपयांची वस्तू पंधरा रुपयांना मिळेल का, दहा रुपयांची वस्तू आठ रुपयांना देणार का, पाच रुपयांत आणखी काही देणार का, असा मोलभाव करत राहतो. गंमत अशी आहे की त्याच आपण मोठ्या दुकानात जातो, मॉलमध्ये जातो, ब्रँडेड वस्तू घेतो, किंमत पाहतो आणि न विचारता पैसे देतो. दुकानदाराने पाचशे रुपये सांगितले तर पाचशे रुपये देतो, हजार रुपये सांगितले तर हजार रुपये देतो; पण रस्त्याच्या कडेला बसलेल्या गरीब माणसाने वीस रुपये सांगितले की आपल्यातील व्यापारी जागा होतो. आपण पाच रुपयांसाठी त्याच्याशी हुज्जत घालतो. कधी कधी विचार करतो का की आपण वाचवलेले ते पाच रुपये आपल्या आयुष्यात काय बदल घडवणार आहेत आणि त्याच पाच रुपयांनी त्या माणसाच्या घरात काय होऊ शकतं? आपल्या मुलाच्या एका चॉकलेटसाठी आपण पन्नास रुपये सहज खर्च करतो, चहासाठी वीस-तीस रुपये देतो, हॉटेलमध्ये शंभर-दोनशे रुपयांचं बिल देताना फारसा विचार करत नाही; पण ज्याच्या घरात त्या दिवसाची भाजी येणंही कठीण आहे, त्याच्याकडे मात्र आपण पैशांचा हिशोब मांडतो. खरे तर त्याने वीस रुपये सांगितले तर शक्य असेल तर पंचवीस रुपये देऊन ती वस्तू घ्यायला हवी. त्या अतिरिक्त पाच रुपयांनी आपली श्रीमंती कमी होणार नाही; पण त्याच्या मनातला विश्वास वाढेल. कदाचित त्या पाच रुपयांनी त्याच्या मुलासाठी बिस्कीट येईल, घरात तेलाची बाटली जाईल, आजारी आईसाठी औषध घेता येईल किंवा रात्रीच्या चुलीवर थोडी अधिक भाजी शिजेल. त्याहून महत्त्वाचं म्हणजे त्याला जाणवेल की अजूनही या शहरात माणुसकी जिवंत आहे. कारण या लोकांना दया नको असते, भीक नको असते, त्यांना त्यांच्या कष्टाची योग्य किंमत हवी असते. त्यांच्या हातावर पडलेल्या घट्ट झालेल्या रेषा ही त्यांच्या गरिबीची नाही, तर त्यांच्या कष्टाची साक्ष असते. एखाद्या वृद्ध आजीला रस्त्याच्या कडेला दोन-चार पेन घेऊन बसलेलं पाहिलं आहे का? ती हात पसरून भीक मागत नसते; ती पाच रुपयांचा पेन विकत असते. तिचं वय तिला विश्रांती सांगत असतं, शरीर तिला थांबायला सांगत असतं, पण परिस्थिती तिला रस्त्यावर बसवून ठेवते. ती म्हणते, "साहेब, पेन घ्या..." त्या चार शब्दांत भीक नसते; त्यात तिचा स्वाभिमान असतो. तिला कुणाच्या दारात उभं राहायचं नसतं, कुणाकडे हात पसरायचा नसतो. तिला फक्त एवढंच हवं असतं की आज स्वतःच्या कष्टाने दोन रुपये मिळावेत आणि संध्याकाळी आपल्या घरात परतताना आपण कुणावर ओझं झालो नाही, याचं समाधान असावं. पण आपण अनेकदा अशा माणसांकडे दुर्लक्ष करून पुढे जातो. त्याच दिवशी मंदिरात जातो, देवासमोर हात जोडतो आणि दानपेटीत शंभर, पाचशे, हजार रुपये टाकतो. देवाला दान देणं चुकीचं नाही; श्रद्धा प्रत्येकाची असते आणि ती मनापासून असली पाहिजे. पण मनात एक प्रश्न नक्कीच विचारायला हवा—देव फक्त मंदिराच्या गाभाऱ्यात आहे का? मंदिराबाहेर उन्हात बसलेली ती वृद्ध व्यक्ती देवाच्या लेकरातली नाही का? रस्त्याच्या कडेला भाजी विकणाऱ्या त्या आईच्या डोळ्यांत देव दिसत नाही का? दोन रुपयांचा पेन विकणाऱ्या त्या म्हाताऱ्या माणसाच्या थरथरणाऱ्या हातात देव दिसत नाही का? आपण देवाच्या मूर्तीला फुलं वाहतो, पण समोरच्या जिवंत माणसाला दोन प्रेमाचे शब्द देताना का कंजूष होतो? आपण देवासाठी हजार रुपये दान करतो, पण गरजू माणसाच्या वस्तूची किंमत दोन रुपयांनी कमी करण्यासाठी एवढी घासाघीस का करतो? कदाचित आपण देव शोधताना खूप दूर निघून गेलो आहोत आणि माणुसकी आपल्या अगदी जवळ उभी आहे, हे विसरलो आहोत. या शहरात लाखो लोक धावत आहेत; कोणाकडे पैसा आहे, कोणाकडे सत्ता आहे, कोणाकडे मोठी घरं आहेत, कोणाकडे मोठ्या गाड्या आहेत; पण या सगळ्या गर्दीत अशीही काही माणसं आहेत ज्यांच्या जगण्याचा आधार फक्त त्यांच्या दोन हातांची मेहनत आहे. त्यांना ना एसी दुकानाची गरज आहे, ना मोठ्या जाहिरातींची, ना सोशल मीडियावरील प्रसिद्धीची. त्यांना फक्त एवढंच हवं असतं की त्यांच्या कष्टाचा अपमान होऊ नये. त्यांच्या हातून आपण एखादी भाजी घेतली तर तिची किंमत कमी करण्याआधी त्यांच्या कष्टाचा विचार करावा. एखादं फळ घेतलं तर ते फळ आपल्या हातात येईपर्यंत त्याने केलेला प्रवास आठवावा. एखादी घरगुती वस्तू घेतली तर ती विकण्यासाठी त्याने घरातून बाहेर पडताना घेतलेली आशा आठवावी. आणि जर एखादा गरीब माणूस आपल्याला न सांगता थोडी कोथिंबीर जास्त देत असेल, दोन मिरच्या जास्त देत असेल, एखादं खराब फळ बदलून देत असेल, तर लक्षात ठेवा—आपण त्याच्याकडून फक्त वस्तू घेत नाही आहोत; आपण त्याच्या मनातली माणुसकी स्वीकारत आहोत. खरं तर गरीब माणूस अनेकदा पैशाने गरीब असतो, पण मनाने श्रीमंत असतो. त्याच्याकडे देण्यासाठी फारसं काही नसतं, तरीही तो आपल्या वाट्याला थोडं अधिक देतो. आणि आपण? आपल्या खिशात पैसा असूनही एखाद्याला दोन रुपये अधिक देताना हात आखडतो. हीच आपल्या समाजाची शोकांतिका आहे. आपण पैशांनी मोठे झालो, पण मनाने लहान होत चाललो आहोत. म्हणूनच पुढच्या वेळी रस्त्याच्या कडेला एखादा भाजीवाला दिसला, एखादी आजी पेन विकताना दिसली, एखादा वृद्ध काही वस्तू विकण्यासाठी उन्हात बसलेला दिसला, एखादी गरीब महिला फळांची छोटी टोपली घेऊन बसलेली दिसली, तर कृपया फक्त ग्राहक म्हणून त्यांच्याकडे पाहू नका; एकदा माणूस म्हणून पाहा. त्यांच्याशी दोन प्रेमाचे शब्द बोला. वस्तू घ्या. मोलभाव करू नका. शक्य असेल तर दोन-पाच रुपये अधिक द्या. कारण त्या अतिरिक्त पैशात तुमचं फारसं काही जाणार नाही; पण कदाचित त्यांच्या घरी त्या दिवशी चुल पेटेल, मुलाच्या हातात खाऊ येईल, वृद्धाच्या हातात औषध येईल आणि त्यांच्या मनात एक विचार निर्माण होईल—"अजूनही या जगात चांगली माणसं आहेत." आपण मंदिरात जाऊन देवाला नमस्कार करतो, पण एखाद्या गरजू माणसाला मदतीचा हात देतो तेव्हा कदाचित देव आपल्याला मनातून आशीर्वाद देत असेल. कारण देवाला आपल्या पैशांची गरज नाही; देवाला आपल्या माणुसकीची गरज आहे. पन्नास रुपयांची चप्पल घातलेला माणूस कधी कधी मनाने लाखो रुपयांचा श्रीमंत असतो आणि लाखो रुपयांच्या गाडीत फिरणारा माणूस माणुसकीच्या बाबतीत कफल्लक असतो. म्हणून या साध्या-भोळ्या माणसांना कमी समजू नका. त्यांच्या कपड्यांकडे पाहून त्यांची किंमत ठरवू नका. त्यांच्या दुकानाची लहानशी जागा पाहून त्यांची स्वप्नं छोटी आहेत असं समजू नका. त्यांच्या खिशात किती पैसे आहेत यापेक्षा त्यांच्या मनात किती प्रामाणिकपणा आहे, हे पाहा. त्यांच्या हातावरची कष्टाची जखम पाहा, डोळ्यांतील थकवा पाहा आणि चेहऱ्यावरचं ते समाधान पाहा—कारण ते समाधान आपल्या मोठमोठ्या सुखांपेक्षा कितीतरी मोठं असतं. शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं—गरिबाला दया देऊ नका, त्याच्या कष्टाला किंमत द्या; त्याला उपकार देऊ नका, त्याचा स्वाभिमान जपा; त्याच्याकडून वस्तू घेताना मोलभाव करू नका, कारण तुम्ही कमी केलेली प्रत्येक रुपयाची किंमत कदाचित त्याच्या घरातील एखाद्या गरजेवर परिणाम करत असते. आणि कधी त्या गरीब माणसाने वीस रुपये सांगितले तर शक्य असेल तर पंचवीस रुपये देऊन ती वस्तू घ्या... कारण कदाचित त्या अतिरिक्त पाच रुपयांत त्याच्या घरातील एखाद्या लेकराच्या चेहऱ्यावर हसू उमलेल. त्या हसण्यापेक्षा मोठी कमाई या जगात दुसरी कोणतीच नाही. *साधेभोळे दिसणारे हे लोक खरं तर जगण्याची मोठी शाळा आहेत; त्यांच्या हातात वस्तू कमी असतील, पण त्यांच्या मनात माणुसकीची श्रीमंती अफाट आहे.

**प्रा.डॉ.सतिश लिला नामदेव दोडके - ठाणे**

# तुझे अवेळी जाणे

नाना तुझा अभिनय सदा ,
वास्तवाला हात घालायचा.
गोरगरिबांचे प्रश्न चित्रपटातून,
संवेदनशीलतेने मांडायचा. १

नाना तुझ्या अदाकारीने,
थेट प्रेक्षकांना भिडायचा.
वास्तव परिस्थिती पाहून,
व्यवस्थेवर कोरडे ओढायचा. २

हिंदू,मुस्लिम,शिख,इसाई,
सर्व धर्मांनाच जोडायचा.
वास्तव जीवन जगतांना,
व्यवस्थेचे वाभाडे काढायचा. ३

निर्भीड तुझे वागणे जगणे,
सर्वांना खूप आवडायचा.
सत्य वास्तव मांडतांना कधी,
व्यवस्थेला नाही घाबरायचा. ४

नाना तुझे अवेळी जाणे,
मनाला लावला चटका,
असे अचानक नेण्याची,
नव्हतीच काळाची घटका. ५

जिवंत जागता सुधारक,
कसा कायमचा करपला.
संवेदनशील कलाकार,
आज अवेळीच हरपला. ६

नाम संस्थेच्या माध्यमातून
केले समाज सेवेचे काम.
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी,
दिवसरात्र गाळले घाम. ७

असे अचानक जाण्याची,
नव्हती नटसम्राटाची वेळ.
समाजाची बऱ्याच अंशी,
बसवायची राहिली मेळ. ८



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## कन्नड येथे विद्यार्थी व शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**कन्नड (अरुण थोरात) :** अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त कन्नड येथील सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा कन्नड तालुका यांच्यावतीने शनिवारी इयत्ता दहावी चे विद्यार्थी व शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.यंदा मार्च 2026 मध्ये झालेल्या दहावी बोर्ड परीक्षेत राज्यात सुमारे 94000 विद्यार्थी मराठी विषयात नापास झाले आहेत. त्या पार्श्वभुमीवर अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा कन्नड तालुका यांच्यावतीने शनिवारी कन्नड येथे दहावीच्या विद्यार्थी व मराठी शिक्षकांसाठी दहावीच्या कृतिपत्रिकेवर कार्यशाळेचे आयोजन काण्यात आले आहे. दि. 19 ऑक्टोबर शनिवार रोजी सकाळी 8:30 वाजता सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड येथे ही कार्यशाळा संपन्न होणार आहे.' यशाची अक्षरवाट ' दहावी मराठी कृतीपत्रिका मार्गदर्शन या विषयावर ही कार्यशाळा संपन्न होणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील मराठी भाषा अभ्यासक द्वारकानाथ जोशी हे मराठी विषयासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.कन्नड तालुक्यातील इयत्ता दहावीला शिकणारे विद्यार्थी व मराठी विषय शिक्षक यांच्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा पूर्णपणे मोफत असून विद्यार्थी व शिक्षक यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा कन्नड तालुका यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## लांडग्याचे संवर्धन म्हणजे जैवविविधतेचे संरक्षण

वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने वन्यजीवांचे संवर्धन, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण आणि परिसंस्थेतील प्रत्येक जीवाचे महत्त्व याबाबत जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. गवताळ प्रदेशातील लांडगा हा अशाच महत्त्वाच्या वन्यजीवांपैकी एक असून, तो परिसंस्थेतील अन्नसाखळीचा महत्त्वाचा दुवा आणि नैसर्गिक भक्षक म्हणून कार्य करतो. भारतीय लांडग्याचे शास्त्रीय नाव Canis lupus pallipes असून महाराष्ट्रातील माळराने, गवताळ प्रदेश, झुडपी वनक्षेत्र तसेच शेतीलगतच्या नैसर्गिक अधिवासात त्याचे अस्तित्व आढळते.लांडगा हा केवळ जंगलात राहणारा प्राणी नसून गवताळ परिसंस्थेच्या आरोग्याशी त्याचा थेट संबंध आहे. गवताळ प्रदेशामध्ये गवत, विविध वनस्पती आणि झुडपे ही अन्नसाखळीची सुरुवात करतात. या वनस्पतींवर कीटक, ससे, उंदीर आणि इतर शाकाहारी प्राणी अवलंबून असतात. या प्राण्यांची संख्या नियंत्रित करण्याचे महत्त्वाचे काम लांडग्यासारखे भक्षक करतात. त्यामुळे लांडगा हा अन्नसाखळीतील उच्च पोषण पातळीवरील महत्त्वाचा घटक आहे.लांडगा प्रामुख्याने ससे, उंदीर, घुशी आणि उपलब्धतेनुसार इतर लहान-मध्यम आकाराच्या प्राण्यांची शिकार करतो. त्यामुळे या प्राण्यांची संख्या अनियंत्रितपणे वाढण्यास प्रतिबंध होतो. जर परिसंस्थेत नैसर्गिक भक्षकांची संख्या कमी झाली, तर त्यांच्या भक्ष्य प्राण्यांची संख्या वाढू शकते. परिणामी वनस्पतींवर अधिक चराईचा दबाव निर्माण होऊन गवताळ प्रदेशाच्या नैसर्गिक संतुलनावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच लांडग्याचे अस्तित्व संपूर्ण परिसंस्थेच्या संतुलनासाठी आवश्यक आहे.लांडगा कमकुवत किंवा आजारी भक्ष्यांची शिकार करून नैसर्गिक निवडीच्या प्रक्रियेलाही हातभार लावतो. अशा प्रकारे तो वन्यजीवांच्या लोकसंख्येचे नैसर्गिक नियमन करण्याबरोबरच परिसंस्थेतील जैविक संतुलन राखण्यास मदत करतो. त्याच्या उपस्थितीमुळे अन्नसाखळीतील विविध घटकांमध्ये परस्परसंबंध टिकून राहतात.गवताळ प्रदेश हा अनेकदा जंगलापेक्षा कमी महत्त्वाचा अधिवास समजला जातो; मात्र प्रत्यक्षात माळराने आणि गवताळ प्रदेशांमध्ये अनेक पक्षी, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, कीटक आणि वनस्पतींच्या प्रजातींचे अस्तित्व असते. लांडगा या अधिवासातील महत्त्वाचा भक्षक असल्याने त्याचे संरक्षण म्हणजे केवळ एका प्राण्याचे संरक्षण नव्हे, तर संपूर्ण गवताळ परिसंस्थेचे संरक्षण होय.आज गवताळ प्रदेशांना मानवी अतिक्रमण, अनियंत्रित बांधकाम, रस्ते व इतर पायाभूत सुविधा, अधिवासाचे तुकडीकरण, अति चराई आणि नैसर्गिक अधिवासामध्ये होणारे बदल यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अधिवास कमी झाल्यामुळे वन्यजीवांच्या हालचालींचे मार्गही बाधित होतात. याचा परिणाम लांडगा आणि त्याच्या भक्ष्य प्राण्यांच्या संख्येवर होऊ शकतो.मानव-वन्यजीव संघर्ष हाही लांडग्यांच्या संवर्धनातील महत्त्वाचा विषय आहे. लांडगा मानवी वस्तीजवळ आढळल्यास भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे; मात्र प्रत्येक लांडगा माणसासाठी धोकादायक असतो, असा गैरसमज करणे योग्य नाही. वन्यजीवांच्या वर्तनाचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करून स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती करणे आणि संघर्षाच्या घटना कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने लांडग्याबद्दल समाजामध्ये सकारात्मक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे गरजेचे आहे. लांडगा हा परिसंस्थेतील शत्रू नसून निसर्गाने निर्माण केलेल्या संतुलित व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्याचे अस्तित्व गवताळ प्रदेशातील अन्नसाखळी सुरळीत ठेवण्यास आणि भक्ष्य प्राण्यांच्या संख्येचे नैसर्गिक नियमन करण्यास मदत करते.गवताळ प्रदेशांचे संरक्षण, नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन, वन्यजीवांच्या हालचालींच्या मार्गांचे संरक्षण, अवैध शिकार रोखणे आणि स्थानिक नागरिकांचा वन्यजीव संवर्धनात सहभाग वाढवणे या उपाययोजना लांडग्यांच्या संवर्धनासाठी महत्त्वाच्या ठरतात. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थी, शेतकरी आणि नागरिकांमध्ये वन्यजीवांविषयी वैज्ञानिक माहिती पोहोचविल्यास मानव आणि वन्यजीव यांच्यातील सहअस्तित्व अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकते.वन्यजीव सप्ताह हा केवळ वन्यजीवांविषयी माहिती देण्याचा उत्सव नसून निसर्गाशी असलेले आपले नाते समजून घेण्याची संधी आहे. लांडग्यासारखा भक्षक निसर्गाच्या अन्नसाखळीमध्ये आपले महत्त्वाचे स्थान बजावत असतो. त्यामुळे लांडगा वाचवणे म्हणजे गवताळ प्रदेश वाचवणे, अन्नसाखळीचा समतोल राखणे आणि जैवविविधतेचे संरक्षण करणे होय.आजच्या पिढीने वन्यजीवांचे महत्त्व समजून घेतले आणि त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण केले, तर भविष्यातही गवताळ प्रदेशात लांडग्यांचा नैसर्गिक अधिवास आणि समृद्ध जैवविविधता टिकून राहू शकते. “वन्यजीव वाचवा, गवताळ प्रदेश वाचवा आणि निसर्गाचा समतोल राखा” हा संदेश वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे हीच काळाची गरज आहे.


**डॉ. सुदाम शिवाजीराव जाधव**
**प्राणीशास्त्र विभाग एस के गांधी कॉलेज कडा ता. आष्टी जिल्हा बीड.**
**मो.** 9322712079








# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


## आई सुरक्षित तर बाळ सुरक्षित!

गर्भधारणा हा प्रत्येक कुटुंबासाठी आनंदाचा क्षण असतो. या आनंदासोबत आई आणि होणाऱ्या बाळाच्या आरोग्याची जबाबदारीही सुरू होते. अनेक वेळा गर्भवती महिलेला काही त्रास नसल्यामुळे पहिली तपासणी तीन-चार महिने झाल्यानंतर केली जाते. मात्र गर्भावस्थेच्या सुरुवातीचे दिवस हे आई आणि बाळाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.12 आठवड्यांपूर्वी नोंदणी का?गर्भधारणा निश्चित झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर आरोग्य केंद्रात नोंदणी केल्यामुळे आईची प्राथमिक आरोग्य तपासणी करता येते. रक्तदाब, हिमोग्लोबिन, रक्तगट, रक्तातील साखर तसेच आवश्यक त्या संसर्गजन्य आजारांच्या तपासण्या वेळेवर करता येतात.यामुळे रक्तक्षय, उच्च रक्तदाब, मधुमेह किंवा इतर जोखमीचे घटक लवकर लक्षात येऊ शकतात. अशा गर्भवतीला High Risk Pregnancy म्हणून योग्य निरीक्षणाखाली ठेवता येते आणि गरज असल्यास वेळेवर पुढील उपचारासाठी संदर्भित करता येते.“मला काही त्रास नाही” म्हणून तपासणी टाळू नकाआरोग्याच्या अनेक समस्या सुरुवातीला कोणतीही ठळक लक्षणे न देता असू शकतात. त्यामुळे “त्रास नाही म्हणजे सर्व ठीक आहे” असे समजणे योग्य नाही.नियमित ANC तपासणीमुळे आईचे आरोग्य, बाळाची वाढ आणि गर्भावस्थेतील संभाव्य धोके यांचे योग्य वेळी निरीक्षण करता येते.आईने स्वत:ची कशी काळजी घ्यावी?गर्भधारणा निश्चित झाल्यानंतर डॉक्टरांच्या किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सल्ल्यानुसार औषधे व लोह-फॉलिक ॲसिड घ्यावे. पौष्टिक आणि संतुलित आहार घ्यावा, पुरेशी विश्रांती घ्यावी आणि डॉक्टरांनी सांगितलेल्या तपासण्या वेळेवर करून घ्याव्यात.स्वत:हून कोणतीही औषधे घेणे टाळावे.तसेच गर्भावस्थेत रक्तस्राव, तीव्र पोटदुखी, तीव्र डोकेदुखी, दृष्टी धूसर होणे, अचानक सूज येणे, ताप किंवा इतर गंभीर लक्षणे दिसल्यास विलंब न करता जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.फक्त गर्भवतीची नव्हे, संपूर्ण कुटुंबाची जबाबदारीगर्भवतीची काळजी घेणे ही केवळ महिलेची जबाबदारी नाही. पती, सासू-सासरे, आई-वडील आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याने तिच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.“तिला काही होत नाहीये” असे म्हणण्यापेक्षा “तिची तपासणी वेळेवर झाली का?” हा प्रश्न महत्त्वाचा आहे.आशा सेविका, अंगणवाडी सेविका, ANM आणि आरोग्य कर्मचारी यांनीही गर्भवती महिलांना लवकर नोंदणी, नियमित तपासणी, योग्य आहार आणि धोक्याची लक्षणे याबाबत सातत्याने मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.एक छोटा निर्णय, आई-बाळासाठी मोठे संरक्षणगर्भधारणा कळल्यानंतर पहिली भेट पुढे ढकलू नका. पहिल्या 12 आठवड्यांत नोंदणी करा, नियमित ANC तपासणी करा आणि धोक्याची लक्षणे दुर्लक्षित करू नका.“लवकर नोंदणी, नियमित तपासणी,सुरक्षित मातृत्वाची हीच खरी हमी!”आई निरोगी असेल तर बाळाची सुरुवातही निरोगी होते. सुरक्षित मातृत्वासाठी आरोग्य यंत्रणेसोबत प्रत्येक कुटुंबानेही जबाबदारीने सहभागी होणे गरजेचे आहे.

**डॉ. प्रतिक्षा राजपूतवैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, औराळाता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर**

## मानसिक सुदृढता ही आरोग्याची गुरुकिल्ली - प्रा. सना पंडित




**नागपूर (डॉ. चंद्रशेखर पाटील) :** डॉ. मधुकरराव वासनिक पी . डब्ल्यू . एस . कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर येथे महिला सेलच्या वतीने दि . २९/०९/२०२६ रोजी महाविद्यालयाच्या सिद्धार्थ सभागृहात सकाळी १०:३० वाजता ' भावनिक व मानसिक स्वास्थ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते . व्याख्यानाला प्रमुख वक्ता म्हणून कवयित्री, लेखिका आणि मानसोपचार तज्ञ प्रा . सना पंडित यांना निमंत्रित करण्यात आले होते . कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . यशवंत पाटील उपस्थित होते . तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे, कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्या प्रा . गामिनी मेश्राम, एम सी . व्ही . सी विभागप्रमुख रेखा बावनकुळे , महिला सेलच्या समन्वयिका डॉ . अमृता डोर्लीकर मंचावर उपस्थित होते . प्रमुख वक्त्या प्रा . सना पंडित यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास करायचा असेल तर आपली शारिरिक आणि मानसिक काळजी घेणे महत्वाचे आहे . चिंता, दुःख, राग, अपयश, एकटेपणा या भावनांवर उघडपणे बोलणे जरूरी आहे आजचे जीवन वेगवान झाले आहे . शिक्षणातील स्पर्धा, करिअरची चिंता, आथिक अडचणी , नातेसंबंधातील बदल , सोशल मीडियावरील तुलना, अपेक्षांचे ओझे यामुळे मानसिक ताण जाणवतो, शरीराला थकवा आला की विश्रांती घेतो तशी मनालाही विश्रांतीची गरज असते असे मत व्यक्त केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . यशवंत पाटील यांनी मानसिक व शारिरीक आरोग्य सुदृढ ठेवले तर आरोग्य सुदृढ राहते असे मत प्रतिपादन केले . याप्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रज्ञा बागडे यांनीही आपले विचार व्यक्त केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि वक्त्यांचा परिचय महिला सेलच्या समन्वयिका डॉ . अमृता डोर्लीकर यांनी करून दिला . कार्यक्रमाचे संचालन डॉ . विद्या बावणे यांनी तर आभार डॉ . गायत्री कडवे यांनी केले . कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ, कनिष्ठ, तसेच एम . सी . व्ही . सी . विभागातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली .


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com



Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुर्वणसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


# एकांताचे प्रहर - मनमुक्त हळवे मनस्वी गोंदण




'आई तुझ्या गर्भातच, सुचल्या असवयात मला काही कविता.. तेव्हापासून -कुणी जाणो -हे घोर थोर चंद्रबनातून धावले पाच सैरभैर मोर.. आईच्या चरणी हे एकांताचे प्रहर.ही श्रद्धेय भावनेतून आलेली कविता.इतकी तरल भावबंध घेऊन आलेली आहे.आत्मिक स्वानंद भावनेचा कोलाहल जेंव्हा या सृष्टीची नितळ निर्लेप भाव मोहून टाकतात तेंव्हा कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांना काव्याची एक अमोघता मिळून जाते.हाच मनोज्ञभाव या कवितेचा मर्मग्राही अनुबंध आहे. तत्वमाया, चांदणचकोर, स्पर्शमाया, स्मृतीमोहर या चार अलवार विभाग या कवितेचे सृजनशील सृजनांचे भावानुबंध आहेत.हे एकांताचे प्रहर म्हणजे एक आत्मिक स्वानंद आहे.मानवी मन हे मायाळू स्नेहाळू मायमातीचा गंध होऊन आल्यावर 'चंद्र अस्तानंतर पुन्हा दु:खाची घरघर,जमूनी येती डोईवर, 'एकांताचे प्रहर' ही सृष्टीची तत्वमाया आहे.हवा पाणी व श्वासांचा ही अलाप विलाप आणि या हळव्या अंबरभेठी हे कवीचे चिंतन आशय संपन्न अधिष्ठान आहे."कुणी काहीही कोकलोत/माझ्या पायाखाली लाव्हा आहे/आणि डोक्यावर चांदण्याची शीतलता आहे./मी मातीतील गाढला गेलोय पूर्ण (उभा)/मी पुरुन उरलोय सर्वत्र इथे तिथे/(पृ.११)कविता ही एक सृजनशील मनाची तरलं भावना आहे.जो कवितेच्या डोहात बुडाला ती तरलं मानस घेऊन आलेली आहे.ही 'वळणवाट' गाव शिवारांच्या, माळरान,निळभोर आभाळ,हे मनमुक्तपण प्रचंड विलोभनीय आहे.हे अतिशय हळुवार संवेदनचं नितळ आभाळ आहे.एक कवी जेव्हा सजग भावानुबंधाच्या परिप्रेक्ष्यातून आपल्या मायाळू भावनेतून व्यक्त होतो तेंव्हा 'तत्वमाया'ही की या सृष्टीचा मी एक आजण पामर आहे."मी पाहतो पाण्यात/माझे दु:ख/माझे डोळा/सूर्य मावळून गेल्या/(पृ.१५)हे इच्छा,ही जत्रा, शून्यातून काही, मौनाच्या अथांगतेत गुंजत राहिल्या सावल्या,महाकाव्य,डोह,पताका तसेच अख्या जगचं दु:ख मानगुटावर,ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल मनाची तरलं भावना व्यक्त करते कारण मी सदैव या मंतरलेल्या काव्यगुहेत आहे जसे "हे एकांताचे जग/मला भिववीत नाही/हेच माझे जगणे/आणि जगण्यातूनी उमगणे/ही सविनय अस्सल परिपक्वता ही कविता देऊन जाते.या नियतीचे महाकोडे लक्ष श्वांचे फेरे, जन्म मरण अटळ.एक पक्षी होऊन ही कविता मुक्त आहे ते जगण्याचा मुलंमंत्र देते.ही कोळोखाची लेणी हळव्या काळजात कोरलेली आहे.मौन मुक्याची ही भाषा हे देहबोलीचे स्वर होऊन येते.हा शब्दांगार मुड होऊन येतो तो गुढ अद्भुत आहे.म्हणून कवी शत् जन्माच्या संचिताचे हा काव्यानुबंध आहे.ही धुंदी शब्दमंत्राची.लेणी,मी तरी खरंच निर्मिती कळा या एकांताचा एक मुग्ध संवाद आहे.ज्या कवी वाल्मिकीने कशा अनुभवल्या असतील.ही खरी निर्मितीची मुल्य आहे.काव्यांग हा तळं ढवळून काढतो.ही कवितेचीअगाध चिंतन चिकित्सक मर्मबंधी भाव आहे.'चांदणचकोर' हा सौंदर्याचा देखना सोहळा एक मनस्वी कवी इतक्या सृजन समर्पक भावनेतून व्यक्त करतो जसे."माझीया स्वप्नबिदीच्या आभाळा/शुभ्र चांदण्याचा लळा/कविता स्फुरुनी येते मनी/तोचि ब्रम्हानंदी सोहळा/(पृ.४५)हे चंद्रचकोरी चांदणं,भावविभोर जगणं.हा काव्यानुंबध अथांगते, चांदणंरात्री गहू सोंगणीला.पाथीत आई झोपू घालायची बाया सोंगणीचं गाणं म्हणायच्या.हे गाणं कवीच्या एकांताचा प्रहार होऊन मनाला फुलतं झुलतं राहिलं म्हणून या कवितेचं नातं हे अद्वैत आहे.म्हणून ही कविता मौनाच्या तळाशी वैश्विकता शोधते आहे.चांदोबाचं झाडं,जणू महावृक्ष.मौनाला अंकुर फुटतात हे अल्लड भावविश्व पण आनंदाचं गुपित.अनेक महाकाव्ये चंद्र चांदण्यांची बरसात करते.आईच्या अमृतवाणीचा एक सात्विक दृष्टीबळ व आईची क्षितिजा पारची दृष्टी हवी कविता देऊन जाते.जसे"अंबराच्या भव्य महाली/चंद्र गजगजते झुंबर/आई सांगते पुराणकथा/दारात स्तब्ध औदुंबर/(पृ.४९)हे एकांताचे प्रहर म्हणजे आत्मिक चिंतनाचे वैश्विक बळ आहे.या चंद्रचांदण्याच्या कुरू क्षेत्रात,हा अत्यंत मनस्वी कवडसा उजळत येतो तो असा की, म्हातारीच्या भिंती कोजागिरी होतात.पण हा चांदणं कवडसा म्हातारीच्या चरणस्पर्श करतो.म्हतारी पडक्या छपरात झोपलेली आहे.खरच या आदिम डोहातल्या सावल्या,गर्दगच्च झाडात चंद्र कारूण्याची फुले,अशी घनव्याकुळ होऊन ही कविता येते.मोहर,अर्थ,का कोण जाणे, रस्ता,परिचिती,प्रतिभेचं देणं, विसावा, गुपित,मी चंद्रसांजेला,मुकी बासरी,पांथस्थ,या कवितेचा मर्मग्राही आस्वादक अनुबंध म्हणजे "पाप-पुण्याचा हिशोब हा कुण्या जन्माचा आहे/वाटा संपल्या तरी मी चालत आज आहे/(पृ.७१)या सृष्टीच्या निर्मितीच्या कळा हे असं कसं ते अंत आणि प्रारंभ हे अंतर अनादी अनंत आहे मग हे आयुष्य चांदणमय करणारे कवी मनस्वी आहेत.हा कोजागर हा प्रवास,हा एकातांचा दास, अतिशय हळवे पदर उलगडून जातात.या अनोळखी 'स्पर्शमाया' या उत्तरार्धात कवी लिहितो "जिथे स्तब्ध सावल्यांच्या रांगा/तिथे माझे पाऊल थबके/का कोण त्या झाडामधूनी/मौनातूनी मज साद घालते/(पृ.८१)कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांची ही कविता अतिशय सुक्ष्म तरलं मनोज्ञ दर्शन घडवते.ती कविता काळजाचे अंतरंग घेऊन येते.सांज कलतांना सांज,मोह मदनाचा बाज,झाली सजणसांज,थरकती लाजून पैंजण..ही एक सृजनशील स्पर्श ओढ या कवितेने दिली आहे.मनाच्या डोह काठी,सजणीची भरली ओटी,या कवितेने एक चटकचांदणं मनमोहिनी आनंद तर दिलाच पण अत्यंत दु:ख सल ही तितक्याच संवेदनतेनं आली आहे.हा प्रहर एकांताचा आहे.गोड 'स्मृतिमोहर' ही मन चावळून मनात दंगा करते जसे "मी आडोशाला उभा/सावल्यानो नका करू दंगा/चांदणबनातून वाहते/माझ्या प्रतिभेची गंगा/(पृ.१०१) कविता मनाचे पंखपाखरू होऊन मन मुक्त व्यक्त होते ती ओंजळभर शब्दफुलांची पखरणं असते.पावसाची वस्ती, डोळे,प्रीत,साजणी,दिवा,येई धुक्यातून कोण?या अतिशय मर्मबंधी कविता आहेत.कवी ज्ञानेश्वर लेंडवे यांची ही चंद्रचकोरी भावबंध मनस्वी आहे.जी.के ऐनापुरे लिहितात "या आत्ममग्न कवितेचा हमरस्ता मराठी कवितेच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलातरी इतकी शुद्ध कविता मराठीत क्वचितच सापडेल.हे समकालीन वास्तवाचे सम्यक भान ही कविता आहे.डॉ.रणधीर शिंदे सर याची पाठराखण अशी "आईचे दुध आणि प्रियतम ओढीचा कल्पनाबंध ज्ञानेश्वर लेंडवे यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाला आहे.तसेच मिथकावलीची सावली देखील तीवर आहे.नादबंधाची एक प्रदीर्घ सुरावट कवितेत आहे.कर्णवेल्हाळ शब्दबंधनाचे या कवितेचे रूपसौंदर्य अधिक वर्धमान झाले आहे."अशी ही हळवे काटेरी गोंदण देऊन जाणारी ज्ञानेश्वर जी लेंडवे यांची कविता.

**एकांताचे प्रहर:-(कवितासंग्रह)कवी:-ज्ञानेश्वर लेंडवे प्रकाशन:-ठसा प्रकाशन गृह, नासिक मुखपृष्ठ:-दिनकर मनवर रेखाटने:-श्रीधर अंभोरे, मिलिंद कडणे प्रथमावृती:-२८ ऑगस्ट २०२६पृष्ठ १२६ किंमत ३००/रुपयेपुस्तक**



**परिचय:- डॉ प्रभाकर शेळके जालना**

# गस्तीवरील पोलिसांवर चाकूहल्ला; ६ जणांवर गुन्हा दाखल

दौलताबाद पोलीस रात्रीच्या वेळी गस्त घालणाऱ्या डायल ११२ च्या पोलीस कर्मचाऱ्यांवर ५ ते ६ जणांच्या टोळक्याने शासकीय कामात अडथळा आणत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना दि ०८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री सव्वा एक वाजेच्या सुमारास करोडी रस्त्यावरील आंबेडकर चौकात घडली. या हल्ल्यात एका आरोपीने पोलिसांवर चाकूने वार करून फकिरा नब्बास तडवी यांना गंभीर जखमी केले आहे. तर पोलीस अंमलदार गाडे व चालक नईम शेख यांना सुद्धा मारहाण करण्यात आली आहे याप्रकरणी पोलिसांनी ६ जणांसह त्यांच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ८ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्री ००:१५ वाजेच्या सुमारास पोलीस अंमलदार आपल्या 'डायल ११२' च्या शासकीय वाहनाने (क्रमांक MH12-PT-7769) शरणापूर फाटा ते शहाजापूर रोड परिसरात गस्त घालत होते. रात्री ०१:१० वाजेच्या सुमारास करोडी गावातून येणाऱ्या रस्त्यावरील आंबेडकर चौकात ५ ते ६ महिला व पुरुषांचे टोळके आपसात मोठ्याने वाद घालत गोंधळ घालत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.शासकीय कामात अडथळा आणि शिवीगाळरात्रीच्या वेळी होणारा गोंधळ शांत करण्यासाठी आणि जमावाला पांगवण्यासाठी पोलीस कर्मचारी तिथे पोहोचले. पोलिसांनी त्यांना रात्रीच्या वेळी विनाकारण गर्दी न करता आपापल्या घरी जाण्यास सांगितले. याचा राग मनात धरून जमावाने पोलिसांशीच वाद घालण्यास सुरुवात केली. "तुम्ही आम्हाला सांगणारे कोण?" असे म्हणत त्यांनी पोलिसांना अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.धारदार चाकूने पोलिसांवर वारहा वाद इतका वाढला की आरोपींनी पोलिसांवर थेट हल्ला चढवला. यादरम्यान, तिथल्या एका महिला आरोपीने "याच्याजवळ चाकू आहे, हा पोलिसाला संपवून टाकेल, याला जिवंत सोडायचे नाही" असे चिथावणीखोर वक्तव्य केले. त्यानंतर आरोपीने जवळ असलेला धारदार चाकू काढून पोलीस अंमलदाराच्या दिशेने चालवला. हा वार चुकवण्याच्या प्रयत्नात अंमलदाराच्या हाताच्या बोटावर आणि मनगटावर चाकू लागल्याने ते गंभीर जखमी झाले. या गोंधळात इतर आरोपींनी पोलिसांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली आणि शासकीय कामात गंभीर अडथळा निर्माण केला.६ जणांविरुद्ध गुन्हा दाखलपोलिसांनी तत्परतेने कारवाई करत घटनास्थळावरून काही जणांना ताब्यात घेतले असून, इतर आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. याप्रकरणी पोलिसांनी शाहरुख उर्फ जावेद, रोहिणी सुभाष बेळगे,अश्विनी सुभाष बेळगे,सागर संजय इंगळे,अभि गायकवाड,रोहित चव्हाण सर्व राहणार कमलापूर रांजणगाव छत्रपती संभाजीनगरया सहा नामजद आरोपींसह कमळापूर आणि राजनगाव परिसरातील त्यांच्या इतर साथीदारांविरुद्ध शासकीय कर्मचाऱ्यावर हल्ला करणे, घातक शस्त्राने दुखापत करणे, शिवीगाळ व शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०९ ऑक्टोबर २०२६


# क्रांतिवीर नाना पाटेकर : संघर्षातून घडलेला अभिनयाचा 'नटसम्राट'

भारतीय चित्रपटसृष्टीत काही कलाकार असे असतात की ते केवळ भूमिका साकारत नाहीत, तर त्या भूमिकेला स्वतःचे अस्तित्व देतात. त्यांच्या आवाजातील चढ-उतार, चेहऱ्यावरील भाव, संवादफेक आणि देहबोली प्रेक्षकांच्या स्मरणात कायमची कोरली जाते. नाना पाटेकर हे अशाच असामान्य कलाकारांपैकी एक होते. हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीत जवळपास पाच दशके काम करताना त्यांनी खलनायक, नायक, पोलीस अधिकारी, सैनिक, सामाजिक कार्यकर्ता, विनोदी व्यक्तिरेखा आणि रंगभूमीवरील वृद्ध कलाकार अशा असंख्य भूमिका साकारल्या. परिंदा, क्रांतिवीर, तिरंगा, वजूद, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, वेलकम आणि नटसम्राट यांसारख्या चित्रपटांनी त्यांच्या अभिनयाची वेगवेगळी रूपे प्रेक्षकांसमोर आणली.जन्म आणि बालपण नाना पाटेकर यांचे मूळ नाव विश्वनाथ दिनकरराव पाटेकर. त्यांचा जन्म १ जानेवारी १९५१ रोजी महाराष्ट्रातील मुरूड-जंजिरा येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दिनकरराव पाटेकर तर आईचे नाव संजनाबाई पाटेकर असे होते. त्यांचे बालपण आर्थिक अडचणींमध्ये गेले. लहानपणापासूनच त्यांना चित्रकला, नाटक आणि अभिनयाची आवड होती. मात्र घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे किशोरवयातच त्यांना काम करावे लागले. नानांनी चित्रपटांची पोस्टर्स रंगवण्याचे काम केले. दिवसातून एक वेळचे जेवण आणि अत्यल्प मोबदला अशा कठीण परिस्थितीत त्यांनी काम केले. शाळा आणि काम यांचा संघर्ष करत त्यांनी आपले शिक्षण सुरू ठेवले. हा संघर्ष त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा भाग बनला. पुढे त्यांच्या अभिनयात दिसणारी आक्रमकता, संवेदनशीलता आणि सामान्य माणसाच्या दुःखाची जाणीव यामागे त्यांच्या बालपणीचे अनुभव होते.शिक्षण नानांनी मुंबईतील सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट येथे कला शिक्षण घेतले. चित्रकलेच्या प्रशिक्षणामुळे त्यांना रंग, आकार, प्रकाश-छाया आणि दृश्यरचनेची जाण मिळाली. मात्र त्यांच्या मनातील अभिनेता त्यांना रंगभूमीकडे घेऊन गेला.रंगभूमी : अभिनयाची खरी शाळा चित्रपटसृष्टीत येण्यापूर्वी नाना पाटेकरांनी मराठी रंगभूमीवर काम केले. रंगभूमीने त्यांना संवादफेक, आवाजाचा प्रभाव, देहबोली, व्यक्तिरेखेची मानसिकता आणि प्रेक्षकांसमोर थेट अभिनय करण्याचे तंत्र शिकवले. नानांसाठी रंगभूमी ही केवळ अभिनयाची सुरुवात नव्हती, ती त्यांच्या अभिनयाची खरी शाळा होती. याच अनुभवामुळे पुढे चित्रपटातील त्यांची संवादफेक इतकी प्रभावी झाली. ते संवाद केवळ बोलत नसत, तर संपूर्ण प्रसंग प्रेक्षकांसमोर जगत असत.चित्रपटसृष्टीत पदार्पण नाना पाटेकर यांनी १९७८ मध्ये गमन या चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. सुरुवातीच्या काळात त्यांना मोठ्या भूमिका मिळाल्या नाहीत. अनेक छोट्या-मोठ्या भूमिका करत त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. गमन, अंकुश, प्रतिघात, अंधा युद्ध आणि सलाम बॉम्बे ! यांसारख्या चित्रपटांमधून त्यांची अभिनयशैली प्रेक्षकांच्या लक्षात येऊ लागली. १९९३ मध्ये प्रदर्शित झालेल्या तिरंगा या चित्रपटाने नाना पाटेकरांना घराघरांत पोहोचवले. पोलीस निरीक्षक शिवाजीराव वाघले या भूमिकेतील त्यांच्या दमदार अभिनयाने आणि प्रभावी संवादफेकीने प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवला. गमन (१९७८) पासून सुरू झालेला नाना पाटेकरांचा चित्रपटप्रवास जवळपास पाच दशकांचा आहे. सुरुवातीच्या काळात सिंहासन (१९७९), भालू (१९८०), रघु मैना (१९८२), सावित्री (१९८३), आज की आवाज (१९८४), गिद्ध (१९८४), गड जेजुरी जेजुरी (१९८५), अंकुश (१९८६), माफीचा साक्षीदार (१९८६), फांसी का फंदा (१९८६), सूत्रधार (१९८७), मोहरे (१९८७), अंधा युद्ध (१९८७), प्रतिघात (१९८७), आवाम (१९८७), त्रिशाग्नी (१९८८), सागर संगम (१९८८), सलाम बॉम्बे! (१९८८), परिंदा (१९८९/१९९०), थोडासा रुमानी हो जाएँ (१९९०), दिशा (१९९०), प्रहार (१९९१), दीक्षा (१९९१), राजू बन गया जेंटलमन (१९९२) आणि अंगार (१९९२) अशा चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाची वेगळी ओळख निर्माण केली. १९९३ नंतर त्यांच्या कारकिर्दीने आणखी वेग घेतला. तिरंगा (१९९३), क्रांतिवीर (१९९४), हम दोनों (१९९५), अग्निसाक्षी (१९९६), खामोशी : द म्युझिकल (१९९६), गुलाम-ए-मुस्तफा (१९९७), यशवंत (१९९७), वजूद (१९९८), युगपुरुष (१९९८), कोहराम (१९९९), हू तू तू (१९९९), तर्कीब (२०००), गँग (२०००), शक्ती : द पॉवर (२००२), वध (२००२), भूत (२००३), आंच (२००३) आणि डरना मना है (२००३) अशा विविध चित्रपटांमधून त्यांनी गंभीर, भावनिक, नकारात्मक आणि सामाजिक आशयाच्या व्यक्तिरेखा साकारल्या. त्यानंतर अब तक छप्पन (२००४), अपहरण (२००५), ब्लफमास्टर (२००५), टॅक्सी नंबर ९२११ (२००६), फिर हेरा फेरी (२००६), वेलकम (२००७), दस कहानियाँ (२००७), हॅट्रिक (२००७), यात्रा (२००७), बोम्मलाट्टम (२००८), एक : द पॉवर ऑफ वन (२००९), राजनीती (२०१०), पाठशाला (२०१०), तुम मिलो तो सही (२०१०), शागिर्द (२०११), देऊळ (२०११), कमाल धमाल मालामाल (२०१२), द अटॅक्स ऑफ २६/११ (२०१३), डॉ. प्रकाश बाबा आमटे : द रिअल हिरो (२०१४), अब तक छप्पन २ (२०१५), वेलकम बॅक (२०१५) आणि नटसम्राट (२०१६) या चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाची विविध रूपे प्रेक्षकांसमोर आणली. नटसम्राटनंतरही त्यांचा अभिनयप्रवास सुरूच राहिला. गोलमाल अगेन (२०१७), वेडिंग ॲनिव्हर्सरी (२०१७), आपला माणूस (२०१८), काला (२०१८), इट्स माय लाइफ (२०२०), तडका (२०२२), द व्हॅक्सिन वॉर (२०२३), वनवास (२०२४) आणि हाउसफुल ५ (२०२५) अशा चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाची छाप कायम ठेवली. जवळपास पाच दशकांच्या या प्रवासात नाना पाटेकरांनी विविधांगी भूमिका साकारत आपल्या अभिनयाची वेगळी छाप निर्माण केली. गंभीर, आक्रमक, भावनिक आणि विनोदी अशा प्रत्येक भूमिकेला त्यांनी आपल्या अभिनयाने जिवंत केले. नाना प्रत्येक व्यक्तिरेखेला आपल्या अभिनयाची स्वतंत्र ओळख देत. त्यामुळे त्यांचा चित्रपटप्रवास हा अष्टपैलू कलावंताच्या यशस्वी कारकिर्दीचा महत्त्वपूर्ण अध्याय ठरतो.'परिंदा' आणि राष्ट्रीय पुरस्कार १९८९/१९९० मध्ये प्रदर्शित झालेल्या परिंदा या चित्रपटातील अण्णा सेठ या भूमिकेने नाना पाटेकरांच्या अभिनयाला राष्ट्रीय पातळीवर मोठी ओळख मिळवून दिली. या भूमिकेसाठी त्यांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. नानांच्या अभिनयातील तीव्रता, आवाज आणि व्यक्तिरेखेतील मानसिक गुंतागुंत या भूमिकेतून ठळकपणे समोर आली.'प्रहार' : अभिनेता आणि दिग्दर्शक १९९१ मध्ये प्रहार : द फायनल अटॅक हा चित्रपट आला. या चित्रपटाद्वारे नाना पाटेकरांनी दिग्दर्शक म्हणूनही आपली क्षमता दाखवली. या चित्रपटात त्यांनी अभिनयही केला. सैन्य, शिस्त, प्रशिक्षण आणि सैनिकांचे मानसिक जग यांचे चित्रण त्यांनी प्रभावीपणे केले.'क्रांतिवीर' : सामान्य माणसाच्या संतापाचा आवाज १९९४ मधील क्रांतिवीर हा नाना पाटेकरांच्या कारकिर्दीतील सर्वांत महत्त्वाचा टप्पा ठरला. प्रताप नारायण तिळक या व्यक्तिरेखेतून त्यांनी भ्रष्टाचार, सामाजिक अन्याय आणि व्यवस्थेविरुद्धचा संताप अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केला. या भूमिकेसाठी त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचा सर्वोत्कृष्ट अभिनेता हा सन्मान मिळाला. 'क्रांतिवीर' मधील नानांचा आवाज, संवादफेक आणि अभिनयाची तीव्रता आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे.'अग्निसाक्षी'१९९६ मध्ये प्रदर्शित झालेल्या अग्निसाक्षी या चित्रपटातील भूमिकेसाठी नाना पाटेकरांना सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. या पुरस्कारामुळे अभिनयाच्या वेगवेगळ्या प्रकारांसाठी राष्ट्रीय स्तरावर गौरव मिळवणाऱ्या मोजक्या अभिनेत्यांमध्ये त्यांचे नाव आले.'वजूद' : प्रेम आणि वेदनेची बाजू नाना पाटेकरांच्या अभिनयातील भावनिक आणि प्रेमळ बाजू वजूद या चित्रपटातूनही प्रकर्षाने समोर आली. कैसे बताऊँ मैं तुम्हें, मेरे लिए तुम कौन हो ... या कवितेतून प्रेम, एकटेपणा आणि अंतर्मनातील संघर्षाची भावना व्यक्त होते. विशेष म्हणजे, त्यानंतरच्या काळात नाना पाटेकरांनी एका कार्यक्रमात माधुरी दिक्षितबद्दल आपल्या मनातील एकतर्फी प्रेमभावना मिश्कीलपणे व्यक्त केली होती. माधुरीसाठी सादर केलेली ही कविता त्यांच्या वजूद मधील भावविश्वाशी आणि संवेदनशील अभिनयाच्या आठवणींशी जोडली गेली. क्रांतिवीर मधील आक्रमक अभिनेता आणि वजूद मधील भावनिक अभिनेता हे दोन्ही पैलू नानांच्या अभिनयाच्या व्याप्तीची जाणीव करून देतात. प्रेम आणि विवाहनाना पाटेकर यांच्या वैयक्तिक आयुष्यात नीलकांती पाटेकर यांचे महत्त्वाचे स्थान होते. दोघांची ओळख मराठी रंगभूमीच्या वातावरणातून झाली. पुढे त्यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि दोघांनी १९७८ मध्ये विवाह केला. त्यांना मल्हार पाटेकर हा मुलगा आहे.'अब तक छप्पन' २००४ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अब तक छप्पन' या चित्रपटात नानांनी पोलीस अधिकारी सदानंद यादव यांची भूमिका साकारली. या भूमिकेत त्यांच्या अभिनयातील शांतता, कठोरपणा आणि मानसिक संघर्ष दिसून आला. नानांनी मोठमोठे संवाद न वापरता केवळ चेहऱ्यावरील भाव आणि देहबोलीच्या माध्यमातून व्यक्तिरेखा प्रभावी केली.'वेलकम' : विनोदी अभिनय नाना पाटेकर यांना केवळ गंभीर आणि आक्रमक भूमिकांसाठी ओळखले जात असले तरी 'वेलकम' मधील उदय शेट्टी या व्यक्तिरेखेने त्यांनी विनोदी अभिनयातही आपली वेगळी छाप निर्माण केली. क्रांतिवीर मध्ये प्रेक्षकांना अस्वस्थ करणारा अभिनेता वेलकम मध्ये त्याच प्रेक्षकांना मनमुराद हसवतो, ही त्यांच्या अभिनयातील विविधतेची मोठी साक्ष आहे.राजनीती, अपहरण आणि इतर भूमिका अपहरण, राजनीती, शक्ती : द पॉवर, टॅक्सी नंबर ९२११, भूत, खामोशी : द म्युझिकल, गुलाम-ए-मुस्तफा आणि हू तू तू अशा अनेक चित्रपटांमधून त्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तिरेखा साकारल्या. नकारात्मक भूमिका असो, गंभीर भूमिका असो किंवा सहाय्यक भूमिका, नाना प्रत्येक व्यक्तिरेखेला स्वतःची स्वतंत्र ओळख देत.'डॉ. प्रकाश बाबा आमटे' मराठी चित्रपटसृष्टीतील नानांची एक महत्त्वाची भूमिका म्हणजे डॉ. प्रकाश बाबा आमटे-द रिअल हिरो या चित्रपटात त्यांनी समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांची भूमिका साकारली. एका सामाजिक कार्यकर्त्याच्या जीवनाचा आणि कार्याचा अभ्यास करून त्यांनी ही व्यक्तिरेखा साकारली. या भूमिकेने त्यांच्या अभिनयातील संवेदनशील बाजू पुन्हा एकदा समोर आणली.'नटसम्राट' : गणपतराव बेलवलकर नाना पाटेकरांच्या कारकिर्दीतील सर्वांत भावनिक आणि संस्मरणीय भूमिका म्हणजे 'नटसम्राट' मधील गणपतराव बेलवलकर. वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रसिद्ध ‘नटसम्राट’ या नाटकावर आधारित या चित्रपटात गणपतराव हा आयुष्यभर रंगभूमीवर जगलेला महान अभिनेता आहे. एकेकाळी रंगभूमीचा सम्राट असलेला हा कलाकार वृद्धापकाळात कुटुंबापासून आणि रंगभूमीपासून दूर जातो. त्याच्या आयुष्यातील एकटेपणा, वेदना, प्रेम, राग, अहंकार आणि कलाकार म्हणून असलेली असुरक्षितता नाना पाटेकरांनी अत्यंत प्रभावीपणे साकारली. नटसम्राट ही भूमिका एका अर्थाने नानांनी आपल्या रंगभूमीच्या दीर्घ प्रवासाला दिलेली भावनिक सलामी होती.सामाजिक कार्य : 'नाम फाउंडेशन' नाना पाटेकरांच्या जीवनातील आणखी एक महत्त्वाचा अध्याय म्हणजे त्यांचे सामाजिक कार्य. नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांनी सप्टेंबर २०१५ मध्ये नाम फाउंडेशनची स्थापना केली. महाराष्ट्रातील दुष्काळ, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, पाणीटंचाई आणि ग्रामीण भागातील समस्या यावर काम करण्यासाठी ही संस्था उभी राहिली. जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, कालवे व जलप्रकल्पांचे पुनरुज्जीवन, शेतकरी आणि ग्रामीण भागाला मदत तसेच गावांच्या विकासासाठी विविध उपक्रम संस्थेमार्फत राबवण्यात आले. अभिनेता म्हणून मिळालेली प्रसिद्धी केवळ स्वतःच्या यशासाठी न वापरता समाजातील गरजू लोकांसाठी उपयोगात आणण्याचा नानांचा प्रयत्न त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा पैलू ठरला.पुरस्कार आणि सन्मान नाना पाटेकरांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे पुरस्कार आले. त्यांना 'परिंदा' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. क्रांतिवीर साठी सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. अग्निसाक्षी साठी पुन्हा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला. याशिवाय त्यांना अनेक फिल्मफेअर, झी गौरव आणि इतर पुरस्कारांनी गौरविण्यात आले. भारत सरकारने कला क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत २०१३ मध्ये त्यांना पद्मश्री प्रदान केला. ८ ऑक्टोबर २०२६ रोजी नाना पाटेकर यांचे पहाटे गोव्यात वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने जवळपास पाच दशकांचा अभिनयप्रवास संपला. पण कलाकाराचा प्रवास मृत्यूसोबत संपत नाही. त्याने साकारलेल्या व्यक्तिरेखा, त्याचे संवाद, त्याचा आवाज आणि त्याची कला पुढील पिढ्यांपर्यंत जिवंत राहते. नाना पाटेकरांच्या बाबतीत हे विशेषतः खरे आहे. परिंदा तील अण्णा सेठ, क्रांतिवीर मधील प्रताप तिळक, वजूद मधील भावनिक आणि प्रेमाच्या संघर्षाने भरलेली व्यक्तिरेखा, तिरंगा मधील पोलीस निरीक्षक शिवाजीराव वाघले, अब तक छप्पन मधील सदानंद यादव, वेलकम मधील उदय शेट्टी आणि नटसम्राट मधील गणपतराव बेलवलकर ही पात्रे त्यांच्या अभिनयाची अमिट स्मृती बनून राहतील. चित्रपटांच्या पोस्टर्सवर रंग देणाऱ्या एका गरीब मुलापासून राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता आणि पद्मश्री पुरस्काराने सन्मानित कलावंत होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. वजूद मधील प्रेमाची वेदना असो, क्रांतिवीर मधील अन्यायाविरुद्धचा आक्रोश असो, वेलकम मधील विनोद असो किंवा नटसम्राट मधील गणपतरावाचा एकाकीपणा असो, नाना पाटेकरांनी प्रत्येक भूमिका केवळ साकारली नाही, तर ती जगली. पडदा पडला आहे. पण नानांचा आवाज अजूनही रंगमंचावर घुमत राहील. नटसम्राट संपत नाही, त्याचा फक्त पडदा पडतो.अशा या क्रांतिवीर, नटसम्राट, पद्मश्री नाना पाटेकर यांना विनम्र आदरांजली !


**- अमरदिप रमाबाई हिवराळे**
**मो.९९२३८३७०६० ( संशोधक, जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) दिनांक :- ०७ ऑक्टोबर २०२६**